म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ८५१२

REFBK-0006269

# स्टालिनची रणगर्जना

( कॉ. स्टालिनचीं युद्धकालीन भाषणें )

अधिकृत अनुवाद

REFBK-0006269

लोक—प्रकाशन

१९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई नं. ४.

सप्टेंबर १९४२ ] [ किंमत ४ आणे

हें पुस्तक श्री. आर. आर. बखले यांनीं 'मुंबई वैभव प्रेस', सँढर्स्ट रोड, मुंबई नं. ४, येथें छापलें व शराफ अतहरअली यांनीं 'लोक-प्रकाशन' संस्थेकरितां 'न्यू एज प्रिंटींग प्रेस, १९० वी. खेतवाडी मेन रोड, मुंबई नं. ४', येथें कंपोज करून प्रसिद्ध केलें.

# अनुक्रमणिका


प्रस्तावना ...

१ सोविएट जनतेचें स्वातंत्र्य-युध्द ... ७
३ जुलै १९४१

२ सोविएट क्रांतीचा २४ वा वाढदिवस ... १५
६ नोव्हेंबर १९४१

३ समग्र जनतेचें आशास्थान ... २९
७ नोव्हेंबर १९४१

४ लाल फौजेचा २४ वा वाढदिवस ... ३२
२३ फेब्रुवारी १९४२

५ मे-दिनाचा संदेश ... ३९
१ मे १९४२

# प्रस्तावना

सोविएट यूनियनविरुद्ध जर्मन फॅसिस्टांनीं युद्ध सुरू केल्यानंतरच्या काळांतील कॉ. स्टालिनचीं पांच भाषणें व लेख या पुस्तकांत संकलित केले आहेत. मॉस्को येथील 'परभाषा प्रकाशन गृह' या संस्थेनें प्रसिद्ध केलेल्या अधिकृत पुस्तकावरून हा अनुवाद तयार केला आहे. हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांत रॉयटरमार्फत प्रसिद्ध झालेले या भाषणांचे वृत्तांत कांहींसे त्रोटक व कांहीं ठिकाणीं तर विपर्यस्त व म्हणून गैरसमज उत्पन्न करणारे होते हें या पुस्तकावरून दिसून येईल.

स्टालिनचें सर्वच वाङ्मय जागतिक इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे. लेनिनचा पट्टशिष्य, सोविएट समाजपद्धतीचा निर्माता, भांडवलशाहीनें वेढलेल्या सोविएट राज्याचा कुशल धुरीण, कम्युनिस्ट इंटरनॅशनलचा प्रमुख पुढारी, जागतिक कामगारवर्गाचा विश्वासू मार्गदर्शक, या नात्यानें स्टालिनला जगाच्या इतिहासांत अपूर्व स्थान प्राप्त झालें आहे. स्वातंत्र्यासाठीं व सुखी जीवनासाठीं धडपडणाऱ्या समग्र जगांतील दलित जनतेला दर पावलागणिक अचूक मार्गदर्शन करणें, हेंच त्याच्या वाङ्मयाचें कार्य आहे. त्याच्या लिखाणांत शब्दजंजाळ नाहीं, उथळ भावनावशता नाहीं, पोकळ पांडित्याची कसरत नाहीं; आत्मवंचना नाहीं, अवास्तव तर्कट नाहीं, भेकड संदिग्धपणा नाहीं. साध्या व सरळ भाषेंत, मोजक्या शब्दांत, अत्यंत विकट वस्तुस्थितीची गुंतागुंत उकलून देणें, प्रत्येक प्रश्नाचें विवेचन शास्त्राच्या अत्यंत कठोर कसोटीला उतरेल अशा रीतीनें मांडणें, सत्यदर्शनाच्या आधारें जनतेचा आत्मविश्वास जागृत करणें व तिला उत्साहानें आपलें कार्य करण्यास प्रवृत्त करणें, हे त्याच्या वाङ्मयाचे विशेष गुण आहेत.

प्रस्तुत पुस्तकांतील लेख तर स्टालिन-वाङ्मयाचे मुकुटमणि समजले पाहिजेत. जगाच्या इतिहासांत सध्यांइतका आणीबाणीचा प्रसंग पूर्वीं कधींच आला नव्हता. विश्वव्यापी युद्धाच्या प्रचंड भट्टींत अखिल मानवजातीचें भवितव्य आज घडलें जात आहे. संशय, नैराश्य, अगतिकता, यांची छाया जगाला ग्रासूं पाहात आहे व मानवजातीचे शत्रू तिचा पुरेपूर उपयोग करून घेत आहेत. अशा वेळीं जगाला धीर देणारा, दलित जनतेला आपल्या सामर्थ्याची जाणीव करून देणारा, परिस्थितीचें अचूक निदान करणारा, यशाचा निःसंशय मार्ग दाखविणारा, कॉ. स्टालिनच्या तोडीचा

दुसरा कोण आहे ? हें कार्य पार पाडण्यांत प्रस्तुत पुस्तकांतील लेखांची सर दुसऱ्या कशाला येऊं शकेल ?

सोविएट यूनियनचे युध्दहेतु, प्रस्तुत युध्दाचें स्वरूप, आजच्या परिस्थितींत प्रत्येक देशांतील जनतेचें कर्तव्य, हें युध्द जिंकण्यासाठीं आवश्यक असलेल्या गोष्टी, या युध्दाची अंतिम परिणति, वगैरे मूलभूत प्रश्नांवर स्टालिननें या भाषणांत व लेखांत स्पष्ट प्रकाश पाडला आहे. प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी माणसानें या लेखांचा सखोल अभ्यास केला पाहिजे, या लेखांचें रहस्य पूर्णपणें आत्मसात् केलें पाहिजे. विशेषतः नाना प्रकारच्या पेंचांत सांपडलेल्या व किंकर्तव्यतामूढ होऊं पाहणाऱ्या हिंदुस्थानांतील जनतेला तर आजच्या क्षणीं या उद्बोधक व स्फूर्तिदायक लेखांचें परिशीलन करणें अत्यंत आवश्यक आहे.

आज फॅसिस्ट स्वारीवाले हिंदुस्थानच्या उंबरठ्याशीं खडे आहेत. सोविएट यूनियनच्या व चीनच्या जनतेनें जर जर्मन व जपानी फौजांचा प्रतिकार केला नसता तर कित्येक महिन्यांपूर्वींच हिंदुस्थान या लुटारू नरराक्षसांच्या भक्ष्यस्थानीं गेला असता. सोविएट यूनियनच्या व चीनच्या जनतेनें इतके दिवस फॅसिस्टांविरुध्द तुंबळ युध्द करून केवळ स्वतःचाच बचाव केला नसून हिंदुस्थानचाहि बचाव केला आहे. जर्मन–जपानी फॅसिस्ट अखिल मानवजातीचे वैरी आहेत. त्यांचा नायनाट करणें **सबंध** जगांतील जनतेचें **संयुक्त कार्य** आहे. फॅसिस्टांविरुध्द चाललेलें प्रस्तुत युध्द सबंध जगांतील जनतेचें युध्द आहे, विश्व-लोक-युध्द आहे. फॅसिस्टांचा पाडाव करण्याचें कार्य प्रत्येक देशांतील **जनताच** पार पाडूं शकेल. हिंदुस्थानला जपानी किंवा जर्मन पशूंच्या घशांत जाऊं न देणें, ही गोष्ट हिंदी जनतेच्या दृष्टीनें जितकी जिव्हाळ्याची आहे, तितकी ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या दृष्टीनें असणें शक्य नाहीं. साम्राज्यवाद्यांकडून हिंदुस्थानचा बचाव होणार नाहीं, साम्राज्यवाद्यांच्या हातीं जर प्रस्तुत युध्दाचीं सूत्रें राहिलीं तर हिंदुस्थानचा मलाया-ब्रह्मदेशच होणार. म्हणून प्रस्तुत जनता-युध्दाचीं सूत्रें हिंदी जनतेनें आपल्या हातीं घेतलीं पाहिजेत. प्रत्येक देशांतील स्वातंत्र्यप्रेमी जनतेच्या खांद्याशीं खांदा भिडवून हिंदी जनतेने हें युध्द जिंकण्यासाठीं उत्साहानें पुढें आलें पाहिजे व अशा रीतीनें हिंदुस्थानची व अलंदुनियेची आजादी प्राप्त करून घेतली पाहिजे.

कॉ. स्टालिनच्या ‘विश्व–जनता–युध्दा’च्या सिध्दांतापासून हिंदुस्थानच्या बाबतींत हाच निष्कर्ष निघतो.

ब्रिटन व अमेरिकेच्या फौजा सोविएटच्या लाल फौजेशीं सहकार्य करून फॅसिस्टांविरुध्द लढत आहेत, त्यांना दास्यविमोचन–सेना या नात्यानें पाठिंबा द्या, असा स्पष्ट संदेश स्टालिननें दिला आहे. याचा अर्थ काय ? साम्राज्यवाद्यांचा हृदयपालट

झाला आहे, असें स्टालिनला सांगावयाचें आहे काय ? हृदयपालटाच्या सिध्दांतावर श्रध्दा ठेवणाऱ्या संतजनांत कॉ. स्टालिनची गणना होत नाहीं हें जगजाहीर आहे ! स्टालिन हा निष्ठावंत मार्क्सवादी आहे. त्याची श्रध्दा साम्राज्यवाद्यांवर नसून जनतेवर आहे. त्याची भिस्त साम्राज्यवाद्यांच्या हृदयांवर नसून जनतेच्या कृतीवर आहे. ब्रिटिश अमेरिकन फौजांचें नेतृत्व ज्या साम्राज्यवाद्यांच्या हातीं आहे त्यांची सत्ता बळकट करण्याला आंधळेपणानें हातभार लावा, असें स्टालिनचें सांगणें असणें शक्यच नाहीं. त्यानें स्पष्ट शब्दांत असें सांगितलें आहे कीं प्रस्तुत युध्दांत निरनिराळ्या देशांतील **जनतेची** एकजूट अस्तित्वांत येईल. आज ब्रिटन-अमेरिकेचे साम्राज्यवादी राज्यकर्ते सोविएट यूनियनशीं व चीनशीं जें कांहीं सहकार्य करीत आहेत त्याचें कारण या साम्राज्यवाद्यांचा हृदयपालट हें नसून ब्रिटन-अमेरिकेंतील जनतेचें वाढतें दडपण हेंच होय. हिंदुस्थानापुरतें पाहिलें तरी आजचा प्रश्न फॅसिझम-विरोधी युध्दांत ब्रिटन-अमेरिकेच्या फौजांची मदत घ्यावी कीं घेऊं नये हा नसून, या फौजा हिंदुस्थानांत 'जालियनवाला बाग' निर्माण करण्यासाठीं राहणार कीं फॅसिस्ट स्वारीवाल्यांच्या प्रतिकारांत हातभार लावण्यासाठीं राहणार हाच आहे. या बाबतींत हिंदुस्थानांतील प्रमुख लोकसंस्थेची—राष्ट्रीय कॉंग्रेसची —भूमिका अगदीं स्पष्ट व सरळ आहे. ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या मुंबईच्या ठरावांतसुध्दां ब्रिटिश-अमेरिकन फौजा हिंदुस्थानांतून काढून घेण्याची मागणी तर केली नाहींच, पण स्वतंत्र हिंदुस्थान या फौजांशीं सन्मान्य सहकार्य करील असेंच जाहीर केलें आहे. साम्राज्यवाद्यांच्या हृदयाला पाझर फोडण्याचा व्यर्थ खटाटोप करण्याऐवजीं जर आपण आपल्या देशांतील जनतेची शंभर टक्के एकजूट घडवून आणूं व फॅसिस्ट-विरोधी मोर्चांत सबंध जनतेला संघटित करूं तर आजच्या जागतिक परिस्थितींत आपणांला राष्ट्रीय सरकार अस्तित्वांत आणतां येईल व आजच्या जनता-विरोधी साम्राज्यवादी फौजा दास्यविमोचन--सेना बनतील, हाच याचा अर्थ आहे.

प्रस्तुत पुस्तकांतील लेख औपचारिकदृष्ट्या जरी सोविएट जनतेला उद्देशून असले, तरी वस्तुतः ते सबंध जगांतील जनतेसाठीं आहेत. प्रत्येक देशांतील प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी माणसाच्या हृदयांतून या लेखांचा प्रतिध्वनि उमटल्याशिवाय राहणार नाहीं. प्रत्येकजण हे लेख वाचून वीरश्रीनें उद्गार काढील:—"स्टालिन आमचा पुढारी आहे. मग भिण्याचें कांय कारण ? फॅसिस्ट दैत्यांचा नायनाट होणारच होणार ! आम्हांला विजय मिळणारच ! तो पहा क्षितिजावर जागतिक स्वातंत्र्याचा सूर्योदय ! आजाद हिंदुस्थान जिंदाबाद !"

मुंबई, ता. ५ सप्टेंबर १९४२. संपादक

—०:X:०—

ता. ३ जुलै १९४१

६२६९

# सोविएट जनतेचें स्वातंत्र्य-युद्ध

**सरकारी संरक्षण समितीचा अध्यक्ष या नात्यानें कॉ. स्टालिनचें रेडियो-वरील भाषण.**

कॉम्रेड्स, नागरीकांनों, बंधुभगिनींनों, फौजेंतील व आरमारांतील सैनिकांनों! प्रिय मित्रांनों! तुम्हाला उद्देशून मी हे चार शब्द सांगत आहे.

ता. २२ जून रोजीं आपल्या मातृभूमीवर हिटलरी जर्मनींनें दगलबाजपणें हल्ला केला. हा हल्ला अद्यापि चालू आहे. लाल फौज जरी शौर्यानें प्रतिकार करीत आहे, शत्रूच्या उत्तमोत्तम पलटणींचा व वैमानिक तुकड्यांचा जरी धुव्वा उडविण्यांत आला आहे व रणांगणावर त्यांना समाधि मिळाली आहे, तथापि दुष्मन अजून पुढें सरसावत आहे, नव्या सैनिकांच्या तुकड्या पुढें घालून तो हल्ला करीत आहे. लिथुएनिया, लाटवियाचा बराचसा भाग, श्वेतरशियाचा पश्चिम भाग व पश्चिम युक्रेनचा कांहीं भाग, एवढा टापू काबीज करण्यांत हिटलरच्या सैन्याला यश आलें आहे. फॅसिस्ट विमानांच्या हल्ल्यांचा विस्तार वाढत आहे व मुर्मान्स्क, ओर्शा, मोगिलेव, स्मोलेन्स्क, किएव, ओडेसा व सेवास्तोपोल या शहरांवर बॉंबफेक करण्यांत येत आहे. आपल्या देशावर भयंकर संकट ओढवलें आहे.

आपल्या पराक्रमी लाल फौजेनें अनेक शहरें व अनेक जिल्हे फॅसिस्ट सैन्याच्या कबज्यांत जाऊं दिले, हें झालें तरी कसें? जर्मन फॅसिस्ट सैन्य अजिंक्य आहे अशी जी फुशारकी वढाईखोर फॅसिस्ट प्रचारक सतत मिरवीत असतात, ती खरीच म्हणावयाची काय?

## हिटलरी फौजा अजिंक्य नाहींत

मुळींच नाहीं! इतिहासाची अशी साक्ष आहे कीं कोणतेंही सैन्य अजिंक्य ठरलें नाहीं. नेपोलियनचें सैन्य अजिंक्य समजण्यांत येत असे, पण प्रथम रशियाच्या व नंतर इंग्लंड व जर्मनीच्या सैन्यानें त्याचा पाडाव केला. पहिल्या साम्राज्यशाही युद्धाच्या काळांत कैसर विल्हेमचें सैन्य सुद्धां अजिंक्य समजण्यांत येत असे, पण रशियन व

झाला आहे, असें स्टालिनला सांगावयाचें आहे काय? हृदयपालटाच्या सिध्दांतावर श्रध्दा ठेवणाऱ्या संतजनांत कॉ. स्टालिनची गणना होत नाहीं हें जगजाहीर आहे! स्टालिन हा निष्ठावंत मार्क्सवादी आहे. त्याची श्रध्दा साम्राज्यवाद्यांवर नसून जनतेवर आहे. त्याची भिस्त साम्राज्यवाद्यांच्या हृदयांवर नसून जनतेच्या कृतीवर आहे. ब्रिटिश अमेरिकन फौजांचें नेतृत्व ज्या साम्राज्यवाद्यांच्या हातीं आहे त्यांची सत्ता बळकट करण्याला आंधळेपणानें हातभार लावा, असें स्टालिनचें सांगणें असणें शक्यच नाहीं. त्यानें स्पष्ट शब्दांत असें सांगितलें आहे कीं प्रस्तुत युध्दांत निरनिराळ्या देशांतील **जनतेची** एकजूट अस्तित्वांत येईल. आज ब्रिटन–अमेरिकेचे साम्राज्यवादी राज्यकर्ते सोविएट यूनियनशीं व चीनशीं जें कांहीं सहकार्य करीत आहेत त्याचें कारण या साम्राज्यवाद्यांचा हृदयपालट हें नसून ब्रिटन-अमेरिकेंतील जनतेचें वाढतें दडपण हेंच होय. हिंदुस्थानापुरतें पाहिलें तरी आजचा प्रश्न फॅसिझम-विरोधी युध्दांत ब्रिटन-अमेरिकेच्या फौजांची मदत घ्यावी कीं घेऊं नये हा नसून, या फौजा हिंदुस्थानांत 'जालियनवाला बाग' निर्माण करण्यासाठीं राहणार कीं फॅसिस्ट स्वारीवाल्यांच्या प्रतिकारांत हातभार लावण्यासाठीं राहणार हाच आहे. या बाबतींत हिंदुस्थानांतील प्रमुख लोकसंस्थेची–राष्ट्रीय कॉंग्रेसची –भूमिका अगदीं स्पष्ट व सरळ आहे. ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या मुंबईच्या ठरावांतसुध्दां ब्रिटिश–अमेरिकन फौजा हिंदुस्थानांतून काढून घेण्याची मागणी तर केली नाहींच, पण स्वतंत्र हिंदुस्थान या फौजांशीं सन्मान्य सहकार्य करील असेंच जाहीर केलें आहे. साम्राज्यवाद्यांच्या हृदयाला पाझर फोडण्याचा व्यर्थ खटाटोप करण्याऐवजीं जर आपण आपल्या देशांतील जनतेची शंभर टक्के एकजूट घडवून आणूं व फॅसिस्ट–विरोधी मोर्चांत सर्वंच जनतेला संघटित करूं तर आजच्या जागतिक परिस्थितींत आपणांला राष्ट्रीय सरकार अस्तित्वांत आणतां येईल व आजच्या जनता–विरोधी साम्राज्यवादी फौजा दास्यविमोचन--सेना बनतील, हाच याचा अर्थ आहे.

प्रस्तुत पुस्तकांतील लेख औपचारिकदृष्ट्या जरी सोविएट जनतेला उद्देशून असले, तरी वस्तुतः ते सर्वंच जगांतील जनतेसाठीं आहेत. प्रत्येक देशांतील प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी माणसाच्या हृदयांतून या लेखांचा प्रतिध्वनि उमटल्याशिवाय राहणार नाहीं. प्रत्येकजण हे लेख वाचून वीरश्रीनें उद्गार काढील:—"स्टालिन आमचा पुढारी आहे. मग भिण्याचें काय कारण? फॅसिस्ट दैत्यांचा नायनाट होणारच होणार! आम्हांला विजय मिळणारच! तो पहा क्षितिजावर जागतिक स्वातंत्र्याचा सूर्योदय! आजाद हिंदुस्थान जिंदाबाद!"

मुंबई, ता. ५ सप्टेंबर १९४२.

संपादक

—०:X:०—

ता. ३ जुलै १९४१

२२८९

# सोविएट जनतेचें स्वातंत्र्य-युद्ध

**सरकारी संरक्षण समितीचा अध्यक्ष या नात्यानें कॉ. स्टालिनचें रेडियो-वरील भाषण.**

कॉम्रेड्स, नागरीकांनों, बंधुभगिनींनों, फौजेंतील व आरमारांतील सैनिकांनों ! प्रिय मित्रांनों ! तुम्हाला उद्देशून मी हे चार शब्द सांगत आहे.

ता. २२ जून रोजीं आपल्या मातृभूमीवर हिटलरी जर्मनीनें दगलबाजपणें हल्ला केला. हा हल्ला अद्यापि चालू आहे. लाल फौज जरी शौर्यानें प्रतिकार करीत आहे, शत्रूच्या उत्तमोत्तम पलटणींचा व वैमानिक तुकडयांचा जरी धुव्वा उडविण्यांत आला आहे व रणांगणावर त्यांना समाधि मिळाली आहे, तथापि दुष्मन अजून पुढें सरसावत आहे, नव्या सैनिकांच्या तुकडया पुढें घालून तो हल्ला करीत आहे. लिथुएनिया, लाटवियाचा बराचसा भाग, श्वेतरशियाचा पश्चिम भाग व पश्चिम युक्रेनचा कांहीं भाग, एवढा टापू काबीज करण्यांत हिटलरच्या सैन्याला यश आलें आहे. फॅसिस्ट विमानांच्या हल्ल्यांचा विस्तार वाढत आहे व मुर्मान्स्क, ओर्शा, मोगिलेव, स्मोलेन्स्क, किएव, ओडेसा व सेवास्तोपोल या शहरांवर बॉंबफेक करण्यांत येत आहे. आपल्या देशावर भयंकर संकट ओढवलें आहे.

आपल्या पराक्रमी लाल फौजेनें अनेक शहरें व अनेक जिल्हे फॅसिस्ट सैन्याच्या कबज्यांत जाऊं दिले, हें झालें तरी कसें ? जर्मन फॅसिस्ट सैन्य अजिंक्य आहे अशी जी फुशारकी वढाईखोर फॅसिस्ट प्रचारक सतत मिरवीत असतात, ती खरीच म्हणावयाची काय ?

## हिटलरी फौजा अजिंक्य नाहींत

मुळींच नाहीं ! इतिहासाची अशी साक्ष आहे कीं कोणतेंही सैन्य अजिंक्य ठरलें नाहीं. नेपोलियनचें सैन्य अजिंक्य समजण्यांत येत असे, पण प्रथम रशियाच्या व नंतर इंग्लंड व जर्मनीच्या सैन्यानें त्याचा पाडाव केला. पहिल्या साम्राज्यशाही युद्धाच्या काळांत कैसर विल्हेमचें सैन्य सुद्धां अजिंक्य समजण्यांत येत असे, पण रशियन व

आंग्ल–फ्रेंच सैन्यानें त्याचा अनेकदां पराभव केला व अखेरीस आंग्ल–फ्रेंच सैन्यानें त्याचा धुव्वा उडविला. आजच्या हिटलरच्या जर्मन फॅसिस्ट सैन्याची सुद्धां हीच स्थिति आहे. या सैन्याला आतांपर्यंत यूरपमध्यें फारसा प्रतिकार झाला नाहीं. फक्त आपल्या देशांतच त्याला जबरदस्त प्रतिकार झाला. या प्रतिकारामुळें हिटलरच्या जर्मन फॅसिस्ट सैन्याच्या उत्तमोत्तम पलटणींचा आपल्या लाल फौजेच्या हातून पराभव झाला आहे, व यावरून असा निष्कर्ष निघतो कीं नेपोलियनच्या व विल्हेमच्या सैन्याप्रमाणें या हिटलरी सैन्याचाहि धुव्वा उडवितां येईल, व उडेलच !

## शत्रूच्या पहिल्या विजयाचें रहस्य

तरीसुद्धां जर्मन फॅसिस्ट सैन्यानें आपल्या देशाचा कांहीं भाग काबीज केला आहे याचें मुख्य कारण असें कीं, सोविएट यूनियन विरुद्ध फॅसिस्ट जर्मनीनें ज्या परिस्थितींत युद्ध सुरू केलें ती परिस्थिती जर्मन सैन्याला अनुकूल होती व सोविएट सैन्याला प्रतिकूल होती. वस्तुस्थिति अशी आहे कीं जर्मनी अगोदरपासूनच युद्धांत गुंतला होता व म्हणून जर्मनीच्या सैन्याची जमवाजमव अगोदरच पुरी झाली होती, आणि सोविएट यूनियनवर हल्ला करण्यासाठीं जे १७० डिव्हिजन जर्मनीनें सोविएट सरहद्दीवर आणून ठेवले होते ते जय्यत तयारींत होते व फक्त हल्ल्याच्या इषाऱ्याचीच वाट पाहात होते; उलटपक्षीं सोविएट सैन्याची जमवाजमव करण्याचें व तें सरहद्दीवर नेण्याचें कार्य अजून पार पाडावयाचें होतें. या बाबतींत विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे फॅसिस्ट जर्मनीनें १९३९ सालीं सोविएट यूनियन बरोबर जो अनाक्रमणाचा करार केला होता तो अचानकपणें व दगलबाजीनें त्यानें मोडला, सबंध जग आपणांला चढाईखोर ठरवील याची त्यानें पर्वा केली नाहीं. आपला देश शांततावादी असल्यामुळें व आपणाला करारनामा मोडण्यांत आघाडी मारण्याची इच्छा नसल्यामुळें आपण अर्थात्‌च दगलबाजीचा अवलंब करूं शकलों नाहीं.

## सोविएट–जर्मन कराराचें समर्थन

कुणी असें विचारील कीं, हिटलर–रिबेनट्रॉपसारख्या दगलबाज सैतानांबरोबर अनाक्रमणाचा करार करण्यास सोविएट सरकार संमति देऊं शकलें तरी कसें ? सोविएट सरकारनें ही चूकच केली नाहीं का ? मुळींच नाहीं ! अनाक्रमणाचे करार हे दोन राष्ट्रांच्या दरम्यान शांतता राखण्याचे करार असतात. अशा प्रकारचा करार करण्याची सूचना जर्मनीनें १९३९ सालीं आमच्या पुढें मांडली. असली सूचना फेंटाळून लावणें सोविएटसरकारला शक्य होतें काय ? मला वाटतें कीं कोणतेंही शांतताप्रिय राष्ट्र शेजारच्या राष्ट्राशीं शांततेचा तहनामा करण्याचें नाकारूं शकत नाहीं, मग त्या शेजारच्या राष्ट्राचे सूत्रधार हिटलर–रिबेनट्रॉपसारखे राक्षस व नरभक्षक कां असेनात ! पण अर्थात्‌ एका विशिष्ट अटीवरच असा तहनामा करतां येतो, व ती म्हणजे त्या शांततावादी राष्ट्राच्या अभंगपणाला, स्वातंत्र्याला व इज्जतीला या शांततेच्या

 ठोन. ८५००

तहनाम्यामुळें कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष धोका उत्पन्न होतां कामा नये. जर्मनी व सोविएट यूनियन यांच्या दरम्यान जो अनाक्रमणाचा करार झाला तो अशा प्रकारचा करार होता, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे.

जर्मनीशीं अनाक्रमणाचा करार केल्यामुळें आपला कोणता फायदा झाला? दीड वर्षपर्यंत आपल्या देशाला शांततेनें नांदतां आलें; व करार मोडून फॅसिस्ट जर्मनीनें आपल्या देशावर हल्ला करण्याचें धाडस केल्यास तो हल्ला परतविण्यासाठीं तयारी करण्याची संधि मिळाली. आपल्या दृष्टीनें हा स्पष्ट फायदा होता व फॅसिस्ट जर्मनीच्या दृष्टीनें हा तोटा होता.

### फॅसिस्ट दगलबाजीचे फायदे व तोटे

दगलबाजपणें करार मोडून व सोविएट यूनियनवर हल्ला करून फॅसिस्ट जर्मनीनें काय मिळविलें आणि काय गमविलें? जर्मनीच्या सैन्याला कांहीं काळपावेतों अनुकूल परिस्थिति प्राप्त झाली व एवढ्या बाबतींत जर्मनीचा फायदा झाला, पण राजकीयदृष्ट्या जर्मनीचें नुकसान झालें, कारण खुनी चढाईखोर म्हणून जगभर त्याची नाचक्की झाली. जर्मनीला जो तात्पुरता लष्करी फायदा मिळाला तो क्षणभंगुरच ठरणार यांत नाहीं; उलटपक्षीं सोविएट यूनियनला जो प्रचंड राजकीय लाभ झाला तो महत्वाचा व चिर-कालीन आहे व त्यामुळें या फॅसिस्ट जर्मनीविरुद्ध लढतांना लाल फौजेला निर्णायक स्वरूपाचे लष्करी विजय मिळविणें शक्य होईल हें निश्चितच समजावें.

म्हणून आपली समग्र शूर लाल फौज, आपलें समग्र शूर आरमार, गरूडा-प्रमाणें भरारी मानणारे आपले वैमानिक, आपल्या देशांतील सर्व राष्ट्रांचे लोक, यूरपमधील, अमेरिकेंतील, सर्व उत्तमोत्तम स्त्रीपुरुष, एवढेंच नव्हे तर जर्मनींतील उत्तमो-त्तम स्त्रीपुरुष—सर्वजण जर्मन फॅसिस्टांच्या दगलबाज कृत्यांचा धिक्कार करीत आहेत, सोविएट सरकारच्या वर्तनाची प्रशंसा करीत आहेत, त्यांना कळून चुकलें आहे कीं आपली बाजू न्यायाची आहे, शत्रूचा पराभव होणारच, आपणांला विजयश्री माळ घालणारच!

### लाल फौजेचा अतुल पराक्रम

हें युद्ध आपणांवर बळेंच लादण्यांत आलें आहे. या युद्धामुळें आपला देश व आपला अत्यंत कट्टर व दगलबाज दुष्मन—म्हणजे जर्मन फॅसिझम—यांच्या दरम्यान प्राणांतिक लढा सुरू झाला आहे. आपलें सैन्य शौर्यानें झुंजत आहे. शत्रु नखशिखांत शस्त्रांनीं सज्ज आहे. त्याच्याजवळ भरपूर टँक व विमानें आहेत. अनंत अडचणींना तोंड देऊन लाल फौज व आरमार सोविएट भूमीचा तसूनूतसू भाग स्वार्थत्यागपूर्वक लढवीत आहे. हजारों टँक व विमानांच्या साहाय्यानें लाल फौजेच्या मुख्य पलटणी रणांगणांवर दाखल होऊन लढूं लागल्या आहेत. लाल फौजेचे सैनिक अतुल पराक्रम गाजवीत

आहेत. शत्रूला आपण जास्तजास्त जोरानें प्रतिकार करीत आहोंत व तो प्रतिकार जास्तजास्त प्रभावी होत आहे. लाल फौजेच्या जोडीला समग्र सोविएट जनता आपल्या मातृभूमीच्या रक्षणार्थ खळवळून उठत आहे.

आपल्या देशावरील संकट नाहींसें करण्यासाठीं कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत? शत्रूचा धुव्वा उडविण्यासाठीं कोणते उपाय योजिले पाहिजेत?

## बेफिकिरपणा सोडून द्या

मुख्य गोष्ट आवश्यक आहे ती ही कीं आपल्या देशावर जें संकट ओढवलें आहे तें केवढें प्रचंड आहे याची सोविएट जनतेनें पूर्ण जाणीव करून घेतली पाहिजे व सर्व प्रकारचा बेफिकिरपणा अजिबात सोडून दिला पाहिजे. शांततामय रचनात्मक कार्याची मनोवृत्ति व निश्चितपणा यांचा त्याग केला पाहिजे. युद्धपूर्व काळांत ही मनोवृत्ति अगदीं साहजिकच होती, पण आज युद्धामुळें सबंध परिस्थितींत आमूलाग्र फरक घडून आला आहे व अशा वेळीं ही मनोवृत्ति कायम ठेवणें म्हणजे मरण ओढवून घेणेंच होय. शत्रु क्रूर व निष्ठुर आहे. आपल्या घामानें भिजलेल्या जमिनी बळकावण्यास तो हपापला आहे. आपल्या अंगमेहनतीनें पैदा झालेलें धान्य व तेल हस्तगत करण्यास तो आतुर झाला आहे. जमीनदारांची सत्ता पुनः सुरू करणें, झारशाही पुनः स्थापन करणें, रशियन, श्वेतरशियन, लिथुएनियन, लेट, एस्तोनियन, उझबेक, तातर, मोल्डेवियन, जॉर्जियन, आर्मीनियन, अझरबैजानियन, वगैरे सोविएट यूनियन मधील स्वतंत्र राष्ट्रांच्या राष्ट्रीय संस्कृतीची व राजकीय स्वातंत्र्याची होळी करणें, त्यांचें जर्मनीकरण करणें, त्यांना जर्मन सरदारांचे व रजवाड्यांचे गुलाम बनविणें, हा त्याचा उद्देश आहे. सोविएट राज्य जगणार कीं मरणार, सोविएट यूनियनमधील निरनिराळीं राष्ट्रें जिवंत रहाणार कीं नष्ट होणार, सोविएट यूनियनमधील निरनिराळ्या राष्ट्रांची जनता स्वतंत्र रहाणार कीं गुलाम बनणार, हाच प्रश्न आज आपणांपुढें आहे. सोविएट जनतेनें ही गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे व सर्व प्रकारचा निश्चितपणा सोडून दिला पाहिजे. तिनें कंबर कसली पाहिजे. व नव्या युद्धकालीन परिस्थितीस अनुसरून आपल्या कार्याची पुनर्घटना केली पाहिजे. या परिस्थितींत शत्रूची गय करून चालणार नाहीं.

## बोल्शेविक वीरांचें वैशिष्ट्य

दुसरी गोष्ट म्हणजे रडतराउतानां आणि भागूबाईंना, पळपुट्यांना आणि अकारण भीतीचें वातावरण पसरविणारांना,—आपल्या गोटांत मुळींच थारा देतां कामा नये. आपणाला गुलाम बनवूं पाहणाऱ्या फॅसिस्टांविरुद्ध आपण हें युद्ध करीत आहोंत. या देशभक्तिप्रेरित स्वातंत्र्ययुद्धांत आपल्या लोकांनीं निःस्वार्थ बुद्धीनें भाग घेतला पाहिजे. आपल्या राज्याचा महान् संस्थापक लेनिन सांगत असे कीं धैर्य, शौर्य, युद्धांत निर्भय वृत्ति, देशाच्या दुष्मनांविरुद्ध जनतेच्या खांद्याशीं खांदा भिडवून लढण्याची

तयारी, हे सोविएट स्त्री पुरुषांचे गुण असले पाहिजेत. लाल फौजेंतील, लाल आरमारांतील व सोविएट यूनियनच्या सर्व राष्ट्रांतील करोडों लोकांच्या अंगीं हे बोल्शेविकांचे गुण वाणणें आवश्यक आहे.

## एकच कार्य—शत्रूचा नायनाट !

युद्धकालीन परिस्थितीस अनुसरून आपण तावडतोब आपल्या सर्व कार्याचीं पुनर्घटना केली पाहिजे. रणांगणावर विजय मिळविणें, शत्रूचा नायनाट करण्याची व्यवस्था करणें, हें मुख्य कार्य समजलें पाहिजे व बाकीच्या सर्व गोष्टी या कार्यालाच पोषक असल्या पाहिजेत. श्रम करून स्वातंत्र्याचा व सुबत्तेचा उपभोग घेण्याची निश्चितता आपल्या देशांतील सर्व श्रमिक जनतेला प्राप्त झाली आहे, व म्हणून आपल्या देशा-विरूद्ध जर्मन फॅसिझम द्वेषानें जळफळत आहे. अशा द्वेषानें व रानटी संतापानें प्रेरित झालेल्या जर्मन फॅसिझमला सामोपचारानें शांत करणें शक्य नाहीं, ही गोष्ट सोविएट यूनियनमधील सर्व राष्ट्रांच्या जनतेला कळून चुकली आहे. सो. यू. मधील सर्व राष्ट्रांच्या जनतेनें शत्रूविरूद्ध उठलें पाहिजे व आपल्या हक्काचें, आपल्या भूमीचें, रक्षण केलें पाहिजे. लाल फौजेनें, लाल आरमारानें, सो. यू. च्या सर्व नागरीकांनीं, सोविएट भूमीच्या तसूनूतसू भागाचें रक्षण केलें पाहिजे, आपल्या शहरांच्या व खेड्यांच्या बचावा-साठीं रक्ताचा अखेरचा थेंब सांडेपर्यंत लढलें पाहिजे, आपल्या जनतेमध्यें स्वभावतःच असलेले धाडस, स्वयंप्रेरणा व कार्यक्षमता हे गुण निदर्शनास आणले पाहिजेत.

लाल फौजेला सर्वतोपरीं मदत करण्याची आपण व्यवस्था केली पाहिजे. तिला मनुष्यबळाची व साधन सामुग्रीची जोरदार कुमक मिळेल अशी निश्चित योजना केली पाहिजे. सैन्याची व लष्करी सामानाची वाहतूक वेगानें करण्यांत येईल अशी सोय केली पाहिजे. जखमी माणसांच्या उपचाराची व्यवस्था व्यापक प्रमाणांत अंमलांत आणली पाहिजे.

## पिछाडीचा बंदोबस्त

लाल फौजेची पिछाडी आपण जोरदार केली पाहिजे. आपण जें जें करूं तें सर्व या कार्यालाच पोषक असलें पाहिजे. आपले सर्व उद्योग धंदे अधिक जोरानें चालले पाहि-जेत. रायफल, मशीनगन, बंदुकीच्या गोळ्या, तोफा, तोफगोळे, विमानें, यांची पैदास वाढली पाहिजे. कारखाने, पॉवर स्टेशन, टेलिफोन, तारायंत्र, यांचें संरक्षण करण्याची व्यवस्था केली पाहिजे. सर्व ठिकाणीं विमानहल्ल्यापासून बचाव करण्याची परिणाम-कारक सोय करून ठेवली पाहिजे.

पिछाडीला अंदाधुंदी माजविणाऱ्या लोकांविरूद्ध, पळपुट्या लोकांविरूद्ध, अकारण भीतीचें वातावरण पसरविणाऱ्या ( पॅनिक मॉंगर्स ) विरुद्ध, खोट्या अफवा पसरवि-णाऱ्यांविरुद्ध, आपण निर्दयपणें लढलें पाहिजे. हेर, नासधूस करणारे लोक, शत्रूचे

पॅरॅशूटवाले लोक; यांचा नायनाट केला पाहिजे व या बाबतींत आपल्या सैन्याच्या तुकड्यांना आपण तावडतोब मदत केली पाहिजे. आपण लक्षांत ठेवलें पाहिजे कीं दुष्मन कावेबाज आहे, तो ठकबाजींत तरबेज आहे, खोट्या अफवा पसरविण्याचा त्याला चांगलाच अनुभव आहे, त्याला कसलाहि विधिनिषेध नाहीं. हें सर्व आपण लक्षांत ठेवलें पाहिजे व कोणत्याही फसव्या डावाला बळी पडतां कामा नये. जो जो माणूस अकारण भीतीचें वातावरण पसरवून व स्वतः भागूबाईप्रमाणें वागून देशाच्या संरक्षणाच्या कार्यांत अडथळा आणील त्या त्या माणसाला—मग तो कोणीही असो—तावडतोब लष्करी कोर्टापुढें खेचून आणलें पाहिजे.

## 'दग्धभूमि'डावपेंच

लाल फौजेला जर एखाद्या ठिकाणीं माघार घ्यावी लागली तर सर्व आगगाड्यांचे डबे व इंजिनें अगोदर तेथून हालविलीं पाहिजेत. शत्रूच्या हातीं एकसुद्धां इंजिन, एक सुद्धां डबा, जाऊं देतां कामा नये. त्यांच्या हातीं धान्याचा एकसुद्धां दाणा किंवा तेलाचा एकसुद्धां थेंब पडतां कामा नये. सामुदायिक शेतसंस्थांतील शेतकऱ्यांनीं आपलीं सर्व गुरें पिछाडीला हांकून लावलीं पाहिजेत व आपलें सर्व धान्य पिछाडीला पोंचतें करण्यासाठीं सरकारी अधिकाऱ्यांच्या ताब्यांत दिलें पाहिजे. धातू, धान्य, तेल, वगैरे मौल्यवान मालमत्तेपैकीं जी हालवितां येत नसेल ती नष्ट करून टाकण्यास चुकतां कामा नये.

## व्याप्त प्रदेशांतील गनीमी लढाई

शत्रूनें व्यापिलेल्या मुलुखांत पायदळ व घोडेस्वारांच्या गनीमी तुकड्या स्थापन केल्या पाहिजेत; शत्रूच्या तुकड्यांविरुद्ध लढण्यासाठीं, जिकडे तिकडे गनीमी लढाई सुरू करण्यासाठीं, पूल व रस्ते उडवून देण्यासाठीं, टेलिफोन व तारायंत्र तोडण्यासाठीं, जंगलांना व कोठारांना व माल नेणाऱ्या गाड्यांना आगी लावण्यासाठीं, विध्वंसक गट ( सावोताज ग्रुप्स ) संघटित केले पाहिजेत. शत्रूनें व्यापिलेल्या टापूंत त्याला व त्याच्या साथीदारांना रहाणें अशक्य होईल अशी परिस्थिति निर्माण केली पाहिजे. दर पावलागणिक त्यांचा पाठलाग करून त्यांचा नायनाट केला पाहिजे व त्यांचे सर्व डाव हाणून पाडले पाहिजेत.

## जागतिक जनतेची एकजूट

फॅसिस्ट जर्मनी विरुद्ध चालविण्यांत येणारें हें युद्ध सामान्य प्रकारचें युद्ध समजतां येत नाहीं. हें केवळ दोन फौजांमधील युद्ध नसून जर्मन फॅसिस्ट फौजेविरुद्ध समग्र सोविएट जनतेनें चालविलेलें युद्ध आहे. जुलमी फॅसिस्टांविरुद्ध आपल्या देशाचें रक्षण करण्यासाठीं चालविण्यांत येणाऱ्या या राष्ट्रीय युद्धाचा उद्देश आपल्या देशावरील संकट

 नों. नं. ८५७

नाहींसें करणें हा तर आहेच, पण शिवाय जर्मन फॅसिझमच्या जोखडाखालीं चिरडल्या जाणाऱ्या सर्व युरोपियन राष्ट्रांतील जनतेला मदत करणें हासुद्धां त्यांचा उद्देश आहे. या स्वातंत्र्ययुद्धांत यूरप व अमेरिकेंतील निरनिराळ्या राष्ट्रांची जनता, जुलुमी हिटलर शाहीनें गुलाम बनविलेली जर्मन जनता सुद्धां, आपणाबरोबर विश्वासूपणानें सहकार्य करील. स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपण चालविलेलें युद्ध यूरप व अमेरिकेंतील जनतेनें स्वतःच्या स्वातंत्र्यासाठीं व लोकशाही हक्कांसाठीं चालविलेल्या लढ्यांत विलीन होईल. हिटलरच्या फॅसिस्ट फौजांनीं लादलेल्या व लादूं घातलेल्या गुलामगिरीविरुद्ध व स्वातंत्र्याप्रीत्यर्थ लढणाऱ्या निरनिराळ्या राष्ट्रांतील जनतेची एकजूट या युद्धांत अस्तित्वांत येईल. या बाबतींत ब्रिटनचे मुख्य प्रधान मि. चर्चिल यांनीं सो. यू. ला मदत देण्यासंबंधी जें ऐतिहासिक महत्वाचें भाषण केलें आहे व युनायटेड स्टेट्स सरकारनें आपल्या देशाला मदत देण्यासंबंधी तयारी दर्शविणारी जी जाहीर घोषणा केली आहे, त्यांचा अर्थ पूर्णपणें लक्षांत येण्यासारखा आहे, व त्यावरून चालू परिस्थितीचें निदान करतां येतें. या घोषणांमुळें सो. यू. मधील जनतेची हृदयें कृतज्ञतेच्या भावनेनेंच उचंबळून यावीं हें अगदीं साहजिक आहे.

## जनता सैनिक दलें

कॉम्रेड्स, आपलें सेनाबळ अमर्याद आहे. मदांध शत्रूला ही गोष्ट कळून चुकेल आणि मग त्याची धुंदी उतरेल. लाल फौजेच्या खांद्याशीं खांदा भिडवून हजारों कामगार, सामुदायिक शेतकरी व बुद्धिजीवी लोक शत्रूच्या स्वारीचा प्रतिकार करण्यासाठीं सरसावत आहेत. आपल्या देशांतील जनता करोडोंच्या संख्येंत कंबर कसून उठेल. मॉस्को व लेनिनग्राडच्या श्रमिक जनतेनें लाल फौजेला साहाय्य करण्यासाठीं प्रचंड 'जनता–सैनिक-दलें' (पॉप्युलर गार्ड) उभारण्यास आतांच सुरवात केली आहे. शत्रूची स्वारी होण्याचा जेथें जेथें धोका आहे अशा प्रत्येक शहरांत अशा प्रकारची जनतेचीं दलें उभारलीं पाहिजेत. फॅसिझमविरुद्ध चालविण्यांत येणाऱ्या या देशभक्तिप्रेरित युद्धांत आपल्या प्राणाचें मोल देऊन आपल्या स्वातंत्र्याचें, आपल्या इज्जतीचें, आपल्या देशाचें, रक्षण करण्यास समग्र श्रमिक जनतेला स्फुरण दिलें पाहिजे.

## बोल्शेविक पार्टीचें पुढारीपण

सोविएट यूनियनमधील जनतेच्या सर्व शक्तींचा वेगानें उपयोग करून घेतां यावा व आपल्या देशावर दगलबाजीनें हल्ला करणाऱ्या दुष्मनाचा धुव्वा उडवावा, या हेतूनें एक सरकारी संरक्षण समिती (स्टेट डिफेन्स कमिटी) नेमण्यांत आली आहे व सरकारचे समग्र अधिकार आतां तिच्याकडे सोंपविण्यांत आले आहेत. या सरकारी संरक्षण समितीनें आपलें कार्य सुरू केलें आहे व समग्र जनतेला तिचा असा संदेश आहे कीं लाल फौजेला व लाल आरमाराला स्वार्थत्यागपूर्वक साहाय्य करण्यासाठी

व विजय मिळविण्यासाठीं लेनिन—स्टालिनच्या पार्टीला व सोविएट सरकारला एकजुटीनें पाठिंबा द्या.

**आपल्या शूर लाल फौजेला व आपल्या पराक्रमी लाल आरमाराला पाठिंबा देण्यासाठीं आपली सर्व शक्ति एकवटली पाहिजे !**

**शत्रूचा नायनाट करण्यासाठीं जनतेची सर्व शक्ति एकवटली पाहिजे !**

**पुढें चला आणि विजय मिळवा !**

ता. ६ नोव्हेंबर १९४१

# सोविएट क्रांतीचा २४ वा वाढदिवस

**मॉस्को सोविएट, मॉस्को पार्टी, वगैरे संस्थांच्या संयुक्त सभेंत सरकारी संरक्षण समितीचा अध्यक्ष या नात्यानें कॉ. स्टालिनचें भाषण.**

कॉम्रेड्स् !

आक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीचा विजय होऊन आपल्या देशांत सोविएट राजवट स्थापन झाली, त्या प्रसंगाला आज २४ वर्षें झालीं आहेत. आज आपण सोविएट राजवटीच्या नव्या–२५ व्या–वर्षांत पदार्पण करीत आहोंत.

ऑक्टोबर क्रांतीचा वाढदिवस साजरा करण्यासाठीं भरणाऱ्या सभांत मागील वर्षामध्यें शांततामय रचनेच्या क्षेत्रांत झालेल्या कामगिरीचा आढावा घेण्याचा प्रघात आहे. आणि अशा प्रकारचा आढावा घेणें आजसुद्धां आपणांला शक्य आहे, कारण शांततामय रचनेच्या क्षेत्रांतील आपली कामगिरी दरसालच नव्हे तर दरमहासुद्धां एकसारखी वाढत आहे. ही कामगिरी कोणती, व ती किती प्रचंड आहे, याची सर्वांनाच–मित्रांना व शत्रूंनासुद्धां–माहिती आहे.

परंतु मागील वर्ष केवळ शांततामय रचनेचें वर्ष नव्हतें. आपल्या शांतताप्रिय देशावर दगलबाजपणानें हल्ला करणाऱ्या जर्मन आक्रमकांविरुद्ध या वर्षीं युद्ध सुरू झालें. गेल्या वर्षाच्या पहिल्या सहामाहींतच आपणांला आपलें शांततामय रचनेचें कार्य चालू ठेवतां आलें. या वर्षाच्या उत्तरार्धांत–चार साडेचार महिन्यांत–जर्मन साम्राज्यवाद्यांविरुद्ध निकराचें युद्ध करावें लागलें. अशा रीतीनें या गतवर्षांत युद्धामुळें आपल्या देशाच्या विकासाला नवें वळण मिळालें. युद्धामुळें आपलें शांततामय रचनेचें कार्य बऱ्याच अंशीं कमी झालें आहे, व कांहीं शाखा तर अजिबात बंद पडल्या आहेत. युद्धामुळें आपणांला आपल्या सर्व कार्याची युद्धपरिस्थितीच्या पायावर उभारणी करणें भाग पडलें आहे. युद्धामुळें आपला समग्र देश रणांगणावरील विजयाची सर्वतोपरी तयारी करणारा, आपल्या लाल सेनेला व लाल आरमाराला सर्वतोपरी मदत करणारा, पिछाडीचा तळ बनला आहे.

शांततामय रचनेचा काळ समाप्त झाला आहे. जर्मन स्वारीवाल्यांविरुद्ध स्वातंत्र्य-युद्ध लढण्याचा काळ सुरू झाला आहे.

म्हणून गतवर्षाच्या उत्तरार्धात-उत्तरार्धातील चार–साडेचार महिन्यांत–झालेल्या युद्धघटनांच्या परिणामांचा आढावा घेणें व या स्वातंत्र्ययुद्धांत आपण जे उद्देश पुढें ठेवले आहेत त्यांची चर्चा करणें अगदीं समर्पक होईल.

## चार महिन्यांतील युद्धाचा आढावा

युद्धारंभीं एका सार्वजनिक भाषणांत मी जाहीर केलें होतें कीं या युद्धामुळें आपल्या देशाला भयंकर धोका निर्माण झाला आहे, आपल्या देशावर गंभीर संकट ओढवलें आहे, या संकटाची आपणांला जाणीव झाली पाहिजे, या संकटाचें स्वरूप आपण समजून घेतलें पाहिजे, व युद्धपरिस्थितीच्या पायावर आपल्या सर्व कार्याची उभारणी केली पाहिजे. आज युद्ध सुरू होऊन चार महिने होऊन गेले आहेत, यावेळीं मला जोर देऊन सांगणें भाग आहे कीं हें संकट कमी तर झालें नाहींच, पण उलट पूर्वीं-पेक्षांहि जास्त गंभीर झालें आहे. यूक्रेन, श्वेतरशिया, मोल्डेविया, लिथुएनिया, लाटविया, एस्तोनिया, व इतर अनेक टापूंचा बराच मोठा भाग, शत्रूनें काबीज केला आहे, दोनेत्झ खोऱ्यांत तो घुसला आहे, लेनिनग्राडवर त्याची काळीकुट्ट छाया पडली आहे, आणि आपली दिव्य राजधानी मॉस्को तो ग्रासूं पाहात आहे. जर्मन फॅसिस्ट स्वारीवाले आपला देश लुटत आहे, कामगारांच्या, शेतकऱ्यांच्या व बुद्धिजीवी जनतेच्या श्रमानें निर्माण झालेलीं शहरें व खेडीं ते बेचिराख करीत आहेत. हिटलरच्या फौजा आपल्या देशांतील बिन–लष्करी नागरीकांची कत्तल करीत आहेत, त्यांच्यावर अत्याचार करीत आहेत, स्त्रिया, मुलें किंवा म्हातारीं माणसें यांनासुद्धां दयामाया दाखवीत नाहींत. आपल्या देशाच्या जर्मनांनीं बळकाविलेल्या भागांतील आपले बांधव जुलुमी जर्मनांच्या जोखडाखालीं हैराण झाले आहेत.

आपल्या सैन्यांतील व आरमारांतील योद्ध्यांनीं शत्रूच्या रक्ताचे पाट वाहविले आहेत, ते आपल्या मातृभूमीच्या इज्जतीचें व स्वातंत्र्याचें रक्षण करीत आहेत, पाशवी शत्रूचे हल्ले मर्दपणें परतवून लावीत आहेत. पण दुष्मन् कोणतीहि किंमत देण्यास कचरत नाहीं, स्वतःच्या सैनिकांचें रक्त ओततांना त्याला तिळमात्र पर्वा वाटत नाहीं, रणांगणावर गारद झालेल्या पलटणींची जागा भरून काढण्यासाठीं तो नव्या नव्या पलटणी रवाना करीत आहे, आणि हिंवाळा सुरू होण्याच्या आंत लेनिनग्राड व मॉस्को सर करण्यासाठीं तो आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. कारण हिंवाळा स्वतःला कठीण जाणार हें त्याला ठाऊक आहे.

युद्धाच्या चार महिन्यांत आपले ३,५०,००० सैनिक ठार, १०,२०,००० जखमी, व ३,७८,००० बेपत्ता झाले आहेत. याच अवधींत शत्रूचे ४५ लाखाहून अधिक सैनिक ठार, जखमी व कैद झाले आहेत.

जर्मनीचें राखींव मनुष्यबळ संपुष्टांत येत चाललें आहे, उलटपक्षीं सोविएट यूनियनचें राखींव मनुष्यबळ नुकतेंच उपयोगांत येऊं लागलें आहे. अर्थात् चार महिन्यांच्या युद्धप्रसंगानंतर सोविएट यूनियन पेक्षां जर्मनी पुष्कळच कमजोर झाला आहे यांत शंका नाहीं.

## विद्युत्–युद्धाचा बोजवारा

आपल्या देशावर हल्ला करण्याच्या वेळीं जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांचा असा अंदाज होता कीं दीडदोन महिन्यांत सोविएट यूनियनला ' खलास ' करून टाकूं व एवढ्या अल्प अवधींतच उरल पर्वतापर्यंत जाऊन पोहोचूं. ' विद्युत्–वेगानें ' विजय मिळविण्याची ही योजना जर्मनांनीं गुप्त ठेवली नाहीं, हें आपण कबूल केलें पाहिजे. उलटपक्षीं त्यांनीं तिची चांगलीच जाहिरात केली. परंतु ही ' विद्युत्–योजना ' अत्यंत पोरकटपणाची व निराधार होती, हें आतां प्रत्यक्ष अनुभवानें सिद्ध झालें आहे. ही भ्रमिष्ट योजना सपसेल फसली आहे असें आज समजलें पाहिजे.

पश्चिम यूरपमध्यें ' विद्युत्–युद्ध ' (blitz-krieg) यशस्वी झालें, पण पूर्वेकडे मात्र तें अपेशी ठरून त्याचा बोजवारा उडाला, याची उपपत्ति कशी लावावयाची ? सोविएट यूनियनला दोन महिन्यांत खलास करून टाकूं व एवढ्या अल्पावधींत उरल पर्वतापर्यंत जाऊन पोहोंचूं अशी जी घोषणा जर्मन फॅसिस्ट लष्करी पुढारी करीत होते, ती कशाच्या आधारें ?

पहिली गोष्ट म्हणजे, त्यांना अशी खात्री वाटत होती कीं सोविएट यूनियन-विरुद्ध सार्वत्रिक एकजुटीचा गट अस्तित्वांत आणतां येईल, क्रांतीचा बागुलबुवा उभा करून ग्रेट ब्रिटन व युनायटेड स्टेटस मधील राज्यकर्त्या गटाला घाबरवून सोडल्यानंतर हे देश या गटामध्यें सामील होतील, व अशा रीतीनें सोविएट यूनियन इतर देशांहून अलग पडेल, त्याला एकट्यानेंच लढावें लागेल. प्रत्येक देशांतील अंतर्गत वर्गविरोधांचा फायदा घ्यावा, हे देश व सोविएट यूनियन यांमधील विरोधांचा फायदा घ्यावा, असें धोरण जर्मनांनीं आंखलें होतें, व तें फ्रान्समध्यें यशस्वी होऊन चुकल्याचें त्यांना ठाऊक होतें. क्रांतीच्या बागुलबुवाला घाबरून फ्रान्सच्या राज्यकर्त्यांनीं आपला देश हिटलरच्या चरणीं अर्पण केला व प्रतिकाराचें शस्त्र खालीं ठेवलें. जर्मन फॅसिस्ट लष्करी पुढाऱ्यांना वाटलें कीं ग्रेट ब्रिटनमध्यें व युनायटेड स्टेटसमध्यें सुद्धां याचीच पुनरावृत्ति होणार. इंग्लिश मुत्सद्यांचें मन वळवून त्यांना सोविएट यूनियनविरोधी सार्वत्रिक मोहिमेंत सामील करून घ्यावें, या हेतूनेंच जर्मन फॅसिस्टांनीं इंग्लंडमध्यें कुप्रसिद्ध हेसला रवाना केलें. पण जर्मनांचा अंदाज सपशेल चुकला ! हेसनें प्रयत्नांची शर्थ करून पाहिली, पण सोविएट यूनियनविरुद्ध जर्मन फॅसिस्ट दरवडेखोरांनीं सुरू केलेल्या मोहिमेंत ग्रेट ब्रिटन व युनायटेड स्टेट्स सामील झाले नाहींत, एवढेंच नव्हे तर हिटलरी जर्मनीविरुद्ध ते सोविएट यूनियनलाच सामील झाले. सोविएट यूनियन देश एकटा

पडला नाहीं, उलटपक्षीं ग्रेट ब्रिटन, युनायटेड स्टेट्स्, व जर्मनव्याप्त देश, हे नवे दोस्त त्याला लाभले. अंतर्विरोधांचा फायदा घेण्याचें व क्रांतीच्या वागुलबुवाचा उपयोग करण्याचें जर्मन धोरण यापुढें परिणामकारक होणें शक्य नाहीं, नव्या परिस्थितींत तें निरुपयोगी ठरलें आहे; आणि नुसतें निरुपयोगीच नव्हे, तर जर्मन दरवडेखोरांना तें अत्यंत धोक्याचें ठरलें आहे, कारण युद्धाच्या नव्या परिस्थितींत त्याचा नेमका उलटा परिणाम घडून येत आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे, जर्मनांना अशी खात्री वाटत होती कीं सोविएट समाज-व्यवस्था डळमळीत आहे, सोविएटची पिछाडी डळमळीत आहे, लाल फौजेला पहिला जबरदस्त तडाखा मिळतांच व तिला आरंभीं पराभव खावे लागतांच कामगार व शेतकरी एकमेकांविरुद्ध भांडूं लागतील, सोविएट यूनियनमधील निरनिराळीं राष्ट्रें एकमेकांविरुद्ध लढूं लागतील, ठिकठिकाणी बंडें सुरू होतील, देशांत यादवी माजून त्याचे तुकडे पडतील,—आणि या सर्व गोष्टींमुळें जर्मन स्वारीवाल्यांना उरल पर्वतापर्यंत सरसावणें सोपें जाईल. पण या बाबतींतसुद्धां जर्मनांचा अंदाज सपशेल चुकला! लाल फौजेच्या पराभवांमुळें कामगार व शेतकरी यांची दोस्ती कमजोर होण्याऐवजीं अधिकच भक्कम झाली, सोविएट यूनियनमधील निरनिराळ्या राष्ट्रांचा स्नेहभाव शिथिल होण्याऐवजीं अधिकच दृढ झाला. एवढेंच नव्हे तर यांमुळें सोविएट यूनियनचें राष्ट्र-कुटुंब लाल फौजेला व लाल आरमाराला स्वार्थत्यागपूर्वक पाठिंबा देणारा संयुक्त व अभेद्य तळ बनलें. सोविएटची पिछाडी आज जेवढी मजबूत आहे तेवढी पूर्वीं कधींच नव्हती. आज आपला जेवढा मुलुख गेला आहे तेवढा जर दुसऱ्या कोणत्याहि देशाचा गेला असता, तर त्याला ह्या दिव्यांतून पार पडणें अशक्य झालें असतें व त्याचा अधः-पात झाला असता, असें म्हणावयास हरकत नाहीं. सोविएट समाजव्यवस्था या दिव्यांतून इतक्या उत्कृष्ट रीतीनें पार पडली आहे, एवढेंच नव्हे तर सोविएटची पिछाडी अधिकच मजबूत झालीं आहे, यावरून हेंच सिद्ध होतें कीं सोविएट समाजव्यवस्थेला आज अत्यंत स्थैर्य आलें आहे.

शेवटची गोष्ट म्हणजे, जर्मन दरोडेखोरांना अशी खात्री वाटत होती कीं लाल फौज व लाल आरमार कमकुवत आहेत, जर्मन सैन्याच्या व आरमाराच्या पहिल्या जबरदस्त तडाख्यासरशीं आमचें सैन्य व आरमार चीत होईल, त्याची दाणादाण उडेल, आमच्या देशांत अप्रहितपणें दूरवर घुसण्याला जर्मनांना मुक्तद्वार मिळेल. पण या बाबतींतसुद्धां जर्मनांचा अंदाज सपशेल चुकला. त्यांनीं स्वतःच्या बळाविषयीं फाजील कल्पना करून घेतली व आमच्या सैन्याचें व आरमाराचें बळ बाजवीपेक्षां कमी लेखलें. आपलें सैन्य व आरमार अस्तित्वांत येऊन फारसा काळ लोटलेला नाहीं, ही गोष्ट खरी आहे. चार महिनेच त्याला लढाईचा अनुभव मिळत आहे. आपलें सैन्य व आरमार अद्यापि पूर्णपणें अनुभवी बनूं शकलें नाहीं. उलटपक्षीं दोन वर्षेपर्यंत सतत लढत असलेल्या अनुभवी जर्मन सैन्याशीं व आरमाराशीं त्याला सामना करावा लागत

आहे. परंतु पहिला मुद्दा म्हणजे, जर्मन सैन्यापेक्षां आपल्या सैन्याची हिंमत (morale) अधिक आहे, कारण आपलें सैन्य परचक्रापासून आपल्या मातृभूमीचें रक्षण करीत आहे, आपली बाजू न्यायाची आहे असा त्याला विश्वास वाटतो, उलटपक्षीं जर्मन सैन्य मुलुखगिरीचें युद्ध चालवीत आहे, परकीयांचे मुलुख लुटीत आहे, स्वतःच्या नीच हेतूंच्या न्याय्यतेविषयीं क्षणभरसुद्धां विश्वास वाटणें त्याला शक्य नाहीं. आपले लोक स्वदेशरक्षणाच्या भावनेनें लढत आहेत. या भावनेमुळें आपल्या सैन्यांत वीरपुरुष उदयास येत आहेत, व तें साहजिकच आहे. हे वीर सैनिक लाल सेनेची एकजूट भक्कम करीत आहेत. उलटपक्षीं जर्मन लोक परकीय देश बळकविण्याच्या व लुटण्याच्या भावनेनें लढत आहेत. या भावनेमुळें जर्मन सैन्यांत नीतिभ्रष्ट धंदेवाईक लुटारूंचें पीक माजलें आहे, व तें साहजिकच आहे. हे धंदेवाईक लुटारू जर्मन सैन्याला पोखरून काढीत आहेत. दुसरा मुद्दा म्हणजे, जर्मन सैन्य सोविएट देशांत जसजसें पुढें सरसावत आहे तसतसें जर्मन पिछाडीपासून त्याचें अंतर वाढत आहे, त्याला शत्रुप्रदेशांत लढावें लागत आहे, त्याला परकीय देशांत नवी पिछाडी निर्माण करणें भाग पडत आहे, व ही पिछाडी आपले गनीमी सैनिक उध्वस्त करीत आहेत,—आणि या सर्व कारणां-मुळें जर्मन सैन्याला रसद पुरविण्याची संघटना पूर्णपणें विस्कळित होत आहे, जर्मन सैन्याला स्वतःच्या पिछाडीविषयींच धास्ती उत्पन्न झाली आहे व स्वतःच्या तळाच्या भक्कमपणाविषयीं त्याला विश्वास वाटेनासा झाला आहे. उलटपक्षीं आपलें सैन्य स्वतःच्या देशांत लढत आहे, त्याला पिछाडीकडून सतत पाठिंबा मिळत आहे, त्याला मनुष्यबळ, युद्धसामुग्री व अन्न यांचा निश्चित पुरवठा होत आहे, व त्याला आपल्या पिछाडीविषयीं पूर्ण विश्वास वाटत आहे. म्हणूनच जर्मनांच्या अपेक्षेपेक्षां आपलें सैन्य अधिक प्रबळ ठरलें आहे, व जर्मन स्वारीवाल्यांच्या बढाईखोर जाहिरातबाजीवरून कुणाची जी कल्पना झाली असेल तिच्यापेक्षां जर्मन सैन्य अधिक कमजोर आहे. लेनिन-ग्राड व मॉस्कोच्या वेशीजवळ आपल्या सैन्यानें सुमारें तीस जर्मन डिव्हिजन गारद केले. या दोन शहरांच्या बचावावरून दिसून येतें कीं अनेक नवे सोविएट सैनिक व सेनानायक, वैमानिक, गोलंदाज, ट्रेंच-मॉर्टरवाले सैनिक, टँकयोद्धे, पायदळ शिपाई, व खलाशी, मातृभूमीसाठीं लढण्यांत येणाऱ्या आपल्या युद्धाच्या भट्टींत तावून सुलाखून तयार होत आहेत व झाले आहेत. हे सैनिक उद्यां जर्मन फौजांची गाळण उडवून दिल्याशिवाय राहणार नाहींत.

या सर्व गोष्टींचा एकत्र विचार करतां, पूर्वेकडील विद्युत्-युद्धाचा बोजवारा उडणें अपरिहार्य आहे, यांत शंका नाहीं.

## आपल्या सैन्याच्या तात्पुरत्या पराभवाचीं कारणें

या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. परंतु आणखी एक गोष्ट तितकीच खरी आहे व ती म्हणजे, या अनुकूल गोष्टींच्या जोडीला लाल सैन्याला प्रतिकूल असलेल्या कित्येक

बाबीसुद्धां आहेत व त्यांमुळें आपल्या सैन्याला तात्पुरते पराभव स्वीकारावे लागत आहेत, माघार घेणें भाग पडत आहे, व आपल्या देशाचे बरेचसे टापू शत्रूच्या हातीं जाऊं द्यावे लागत आहेत.

या प्रतिकूल बाबी कोणत्या ? लाल सैन्याला रणांगणांत तात्पुरता पराभव स्वीकारावा लागला याचें कारण काय ?

लाल सैन्याच्या पराभवाचें एक कारण असें कीं जर्मन फॅसिस्ट सैन्याविरुद्ध यूरपमध्यें दुसरी आघाडी निर्माण झालेली नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं सध्यां यूरपखंडांत जर्मन फॅसिस्ट सैन्याविरुद्ध लढण्यासाठीं ग्रेट ब्रिटनचें किंवा युनायटेड स्टेट्सचें सैन्य मुळींच नाहीं, त्यामुळें जर्मनीला स्वतःचें सैन्य विभागणें भाग पडत नाहीं, पूर्व व पश्चिम अशा दोन्ही आघाडींवर लढणें आवश्यक होत नाहीं. साहजिकपणेंच याचा असा परिणाम होत आहे कीं पश्चिमेकडील स्वतःची पिछाडी सुरक्षित आहे असें समजून जर्मनीला स्वतःचें व यूरपमधील स्वतःच्या दोस्तांचें सर्व सैन्य सोविएटविरुद्ध रवाना करणें शक्य झालें आहे. आज परिस्थिति अशी आहे कीं, जर्मनी, फिनलंड, इटली, रुमानिया, व हंगेरी यांच्या संयुक्त फौजांविरुद्ध आपला देश एकट्यानेंच हें दास्यविमोचनाचें युद्ध लढत आहे, त्याला कुणाचेंहि लष्करी साहाय्य मिळत नाहीं. जर्मनी स्वतःच्या तात्पुरत्या विजयांविषयीं वढाई मारीत असतो, स्वतःच्या फौजेची अवास्तव स्तुति करीत असतो, रणांगणावर केव्हांहि ती एकटीच लाल फौजेला खडे चारू शकेल असें जाहीर करीत असतो. पण जर्मनांची ही वढाई जर खरी असेल, तर बाहेरून कोणतीहि लष्करी मदत नसतां केवळ एकट्यानेंच झुंजणाऱ्या लाल फौजेविरुद्ध लढण्यासाठीं जर्मनीनें फिनलंड, रुमानिया, इटली व हंगेरी यांची मदत कां घेतली हें समजूं शकत नाहीं. यूरपमध्यें जर्मनांविरुद्ध दुसरी आघाडी नसल्यामुळें जर्मन सैन्याचें कार्य पुष्कळ हलकें झालें आहे यांत शंका नाहीं. परंतु यूरपखंडांत जर दुसरी आघाडी अस्तित्वांत आली—आणि अर्थात् ती लवकरच अस्तित्वांत आली पाहिजे—तर आपल्या सैन्याचें कार्य पुष्कळच हलकें होईल व जर्मन सैन्याची परिस्थिति विकट होईल, हें निर्विवाद आहे.

आपल्या सैन्याच्या तात्पुरत्या पराभवाचें दुसरें कारण असें कीं आपणांजवळ टँकांचा व कांहीं अंशीं विमानांचा तुटवडा आहे. टँकांच्या अभावीं, व विमानांचा पुरेसा पाठिंबा नसल्यास, पायदळाला लढणें आधुनिक युद्धांत फार मुष्किलीचें होतें. जर्मन विमानांपेक्षां आपलीं विमानें अधिक चांगल्या प्रतीचीं आहेत, आणि आपल्या शूर वैमानिकांनीं निर्भय योद्धे म्हणून नांव गाजविलें आहें. परंतु अद्यापि जर्मनीच्या मानानें आपल्या विमानांची संख्या कमी आहे. आपलीं टँकें जर्मन टँकांपेक्षां अधिक चांगल्या प्रतीचीं आहेत, आणि जर्मनांजवळ पुष्कळ टँकें असतांहि त्यांच्या वढाईखोर फौजांना आपल्या शूर टँकयोद्धयांनीं व गोलंदाजांनीं अनेकां पिटाळून लावलें आहे.

६२६२

परंतु अद्यापि जर्मनीच्या मानानें आपल्या टँकांची संख्या कितीतरी पटीनें कमी आहे. जर्मन सैन्याच्या तात्पुरत्या विजयाचें रहस्य हेंच होय. आपले टँकांचे कारखाने चांगले चालत नाहींत किंवा त्यांत फारच थोडीं टँकें तयार होतात, असें म्हणतां येत नाहीं. तसें म्हणणें चुकीचें होईल. आपले टँकांचे कारखाने चांगले चालत आहेत व त्यांत उत्कृष्ट प्रतीचीं टँकें मोठ्या संख्येंत तयार होत आहेत. पण जर्मनी त्याहूनहि जास्त संख्येंत टँकें तयार करीत आहे. जर्मनीचे स्वतःचे टँकांचे कारखाने तर आहेतच, पण त्याखेरीज झेको-स्लव्हेकिया, बेल्ज्यम, हॉलंड, व फ्रान्स, या देशांतील कारखानेसुद्धां जर्मनीच्या ताब्यांत आहेत. ही परिस्थिति जर नसती तर लाल फौजेनें जर्मन सैन्याचा केव्हांच धुव्वा उडविला असता. जर्मन फौज टँकांशिवाय कधींच रणांगणावर उतरत नाहीं, व जर तिच्याजवळ आमच्यापेक्षां अधिक टँकें नसतील तर आमच्या फौजेच्या हल्ल्यापुढें ती मुळींच टिकाव धरूं शकत नाहीं.

टँकांच्या बाबतींत जर्मनीचें श्रेष्ठत्व नाहींसें करण्याचा व अशा रीतीनें आपल्या सैन्याची परिस्थिति पूर्णपणें सुधारण्याचा एकच मार्ग आहे, व तो म्हणजे आपल्या देशांतील टँकांचें उत्पादन अनेकपटींनीं वाढविणें, एवढेंच नव्हे तर टँकवेधी ( Anti-Tank ) विमानें, टँकवेधी बंदुका व तोफा, व टँकवेधी हातगोळे ( grenade ) व ट्रेंचमॉर्टर, यांचें उत्पादनहि मोठ्या प्रमाणांत वाढविणें, व शक्य तितक्या संख्येंत टँकांचे सांपळे व टँकांना अडथळा करणारीं इतर साधनें तयार करणें, हाच होय.

हें आपलें आजचें कार्य आहे.

हें कार्य आपण पार पाडूं शकतों, व वाटेल तें करून तें पार पाडलेंच पाहिजे.

## नात्सींचें खरें स्वरूप

आपल्या देशांत जर्मन दरवडेखोरांना—म्हणजे हिटलरकंपूच्या लोकांना—‘ फॅसिस्ट ’ म्हणण्याचा प्रघात आहे. असें म्हणणें चुकीचें आहे असें हिटलरकंपूचें मत दिसतें. ते स्वतःला ‘ नात्सी ’ (नॅशनल सोशालिस्ट )—म्हणजे ‘ राष्ट्रीय समाज-सत्तावादी ’—म्हणवितात. यूरपला लुबाडणारा व आपल्या समाजसत्तावादी देशावर भेकड हल्ला करण्यांत पुढाकार घेणारा जर्मन दरवडेखोरांचा पक्ष—हिटलरी पक्ष—हा समाजसत्तावादी पक्ष आहे, असें ते आश्वासनपूर्वक सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत ! पण हें शक्य तरी आहे काय ? यूरपमधील राष्ट्रांना लुबाडणारे व त्यांच्यावर जुलुम करणारे पशुतुल्य हिटलरी दरवडेखोर, आणि समाजसत्तावाद, या दोहोंत कोणतें साम्य असणें शक्य आहे ?

हिटलरकंपूला **‘ राष्ट्रवादी ’** म्हणणें शक्य आहे काय ? मुळींच नाहीं ! वस्तुतः हिटलरकंपूचे लोक राष्ट्रवादी नसून **साम्राज्यवादी** आहेत. जोंपर्यंत हिटलरकंपू जर्मनीचें एकीकरण करण्यांत व ऱ्हाइन टापू , ऑस्ट्रिया, वगैरे पुनः जर्मनींत सामील

करून घेण्यांत गुंतला होता, तोंपर्यंत त्याला राष्ट्रवादी म्हणण्याला थोडीशी तरी जागा आहे असें कदाचित् मानतां आलें असतें, परंतु जेव्हां त्यानें परदेशी मुलुख बळकाविले, यूरपच्या निरनिराळ्या राष्ट्रांना—झेक, स्लव्हक, पोल, नॉर्वेजियन, डेन, डच, बेल्ज्यम, फ्रेंच, सर्व, ग्रीक, यूक्रेनियन, श्वेतरशियन, बाल्टिक देशांचे लोक, वगैरेंना—गुलाम बनविलें, व समग्र जगाचें स्वामित्व मिळविण्याचा उद्योग आरंभिला, तेव्हांपासून या हिटलरी पक्षाचें राष्ट्रीय स्वरूप नाहींसें झालें, कारण त्या क्षणापासून तो लुटारू, जुलुमी, साम्राज्यवादी पक्ष बनला.

**हिटलरी पक्ष हा साम्राज्यवाद्यांचा पक्ष आहे, एवढेंच नव्हे तर तो जगांतील अत्यंत लोभी व लुटारू साम्राज्यवाद्यांचा पक्ष आहे.**

हिटलरकंपूला '**समाजसत्तावादी**' म्हणणें शक्य आहे काय ? मुळींच नाहीं ! वस्तुतः हिटलरकंपूचे लोक समाजसत्तावादाचे कट्टर वैरी आहेत, ते अत्यंत नीच प्रकारचे प्रतिगामी लोक आहेत, त्यांची 'ब्लॅक हंड्रेड' कंपूशीं तुलना करतां येईल, त्यांनीं यूरपमधील निरनिराळ्या राष्ट्रांचे व कामगारवर्गाचे अत्यंत प्राथमिक लोकशाही स्वातंत्र्याचे हक्कसुद्धां हिरावून घेतले आहेत. 'ब्लॅक हंड्रेड' कंपूसारखें स्वतःचें प्रतिगामी अंतरंग झांकून ठेवण्यासाठीं हिटलरकंपू इंग्लंड व अमेरिकेच्या अंतर्गत राजवटीला शिव्या देतो व तिला 'धनिकशाहीची राजवट' असें नांव देतो. परंतु इंग्लंडमध्यें व युनायटेड स्टेट्स्मध्यें प्राथमिक लोकशाही स्वातंत्र्याचे हक्क आहेत, कामगारांच्या व कचेऱ्यांतील नोकरांच्या ट्रेड युनियन संस्था आहेत, कामगारांचे राजकीय पक्ष आहेत, पार्लमेंट आहे. उलटपक्षीं जर्मनीमध्यें हिटलरच्या राजवटींत या सर्व संस्था नष्ट करण्यांत आल्या आहेत. या दोन भिन्न चित्रांची तुलना केल्यास हिटलरी राजवटीचें स्वरूप किती प्रतिगामी आहे व इंग्लंड–अमेरिकेंतील धनिकशाहीच्या राजवटी–विरुद्ध जर्मन फॅसिस्टांनीं चालविलेला आक्रोश किती धादांत लबाडीचा आहे हें सहज लक्ष्यांत येईल. वस्तुतः हिटलरी राजवट म्हणजे झारशाही रशियांतील प्रतिगामी राजवटीची हुबेहुब नक्कलच होय. आपणांला ठाऊक आहे कीं कामगारांचे, बुद्धिजीवी वर्गाचे, व निरनिराळ्या राष्ट्रांचे हक्क झारशाहीइतक्याच बेगुमानपणें हिटलरकंपू चिरडून टाकीत आहे. मध्ययुगाला साजणारे ज्यू–विरोधी दंगे हिटलर कंपूनें झारशाहीइतक्याच बेगुमानपणें घडवून आणले.

**हिटलरी पक्ष हा लोकशाही स्वातंत्र्याच्या वैऱ्यांचा पक्ष आहे, तो मध्ययुगीन प्रतिगामी लोकांचा पक्ष आहे, तो 'ब्लॅक हंड्रेड' कंपूप्रमाणें जातीय दंगे माजविणारांचा पक्ष आहे.**

बेशरम साम्राज्यवाद्यांचा व नीच प्रतिगामी लोकांचा हा कंपू अजूनसुद्धां 'राष्ट्रवादी' व 'समाजसत्तावादी' बुरखा घेऊन मिरवित आहे याचें कारण एवढेंच कीं त्याला जनतेची फसवणूक करावयाची आहे, भोळ्याभाबड्यांच्या डोळ्यांत धूळ फेंकावयाची

आहे, 'राष्ट्रवादा' चें व 'समाजसत्तावादा' चें निशाण पुढें करून स्वतःचें लुटारू साम्राज्यवादी अंतरंग झांकून ठेवावयाचें आहे.

मोरपिसें लावलेले कावळे!... ...पण कावळ्यांनीं मोरपिसांचा कसाहि साज चढविला तरी कावळे ते कावळेच!

हिटलर म्हणतो:—"सबंध जगावर जर्मनांचें स्वामित्व प्रस्थापित करण्यासाठीं आपण वाटेल त्या साधनांचा उपयोग केला पाहिजे. आपणांला जर बलिष्ठ जर्मन साम्राज्य अस्तित्वांत आणण्याची आकांक्षा असेल, तर प्रथम आपण स्लाव जनतेची—रशियन, पोल, झेक, स्लव्हक, बल्गेरियन, यूक्रेनियन, श्वेतरशियन, वगैरे राष्ट्रांची—हकालपट्टी केली पाहिजे, त्यांचा उच्छाद केला पाहिजे. आपण हें कां करूं नये?"

हिटलर म्हणतो:—"मनुष्यप्राणी जन्मतःच पापी असतो. त्याच्यावर केवळ जबरदस्तीनेंच राज्य करतां येतें. त्याच्याशीं वागतांना वाटेल त्या साधनांचा उपयोग करण्यास हरकत नाहीं. आपले हेतु तडीस नेण्यासाठीं जरूर तर आपण खोटें बोलावें, दगलबाजी करावी, खूनसुद्धां पाडावे."

गोअरिंग म्हणतो:— "आपणाला जे जे विरोध करतील त्या सर्वांना ठार करा. त्यांचे मुडदे पाडा. या हत्येबद्दल तुम्हांला जबाबदार धरलें जाणार नाहीं, मीच सर्व जबाबदारी पत्करीन. म्हणून त्यांना ठार करा!"

हिटलर म्हणतो:— "सदसद्विवेकबुद्धि ही मानवजातीची मानहानि करणारी एक भ्रममूलक कल्पना आहे. मी मानवजातीला या कल्पनेच्या पाशांतून मुक्त करीत आहे. शिक्षणामुळें व सदसद्विवेकबुद्धीमुळें माणूस पंगु बनतो. मला तात्त्विक किंवा नैतिक बंधन नसल्यामुळें माझा मार्ग अनिरुद्ध आहे व हेंच माझें सामर्थ्य आहे."

ता. २५ सप्टेंबर रोजीं ४८९ व्या जर्मन पायदळ रेजिमेंटनें काढलेला एक हुकूम ठार झालेल्या एका जर्मन नॉन्-कमिशन्ड ऑफिसराच्या खिशांत सांपडला, त्यांत पुढील मजकूर आहे:—

"कोणताहि रशियन माणूस ६०० मीटर अंतराच्या आंत दिसतांक्षणींच त्याच्यावर गोळी झाडावी, असा मी हुकुम करतों. रशियनांना जाणीव झाली पाहिजे कीं त्यांच्याशीं लढणारा शत्रू खंबीर मनाचा आहे, त्यांनीं त्याच्याकडून कोणत्याहि दयामायेची अपेक्षा करतां कामा नये."

फ्रँकफुर्टचा रहिवाशी लेफ्टनंट गुस्टाव झीगेल याच्या प्रेताच्या खिशांत जर्मन सेनाधिकाऱ्यांनीं सैनिकांना उद्देशून काढलेलें एक पत्रक सांपडलें, त्यांत पुढील मजकूर आहे:—

"तुम्हांला हृदय नांवाचें इंद्रिय नाहीं. युद्धांत हृदयाची कांहींच जरूरी नसते. दयामाया आणि सहानुभूति यांचा लवलेशसुद्धां हृदयांतून काढून टाका. प्रत्येक रशियन माणसाला, प्रत्येक सोविएट नागरीकाला, ठार करा. म्हातारे, स्त्रिया, मुलें,

कुणीहि असो, न कचरतां त्यांना–ठार करा ! असें केलें तरच तुमचा जीव वचावेल, स्वतःच्या कुटुंबाच्या भवितव्याविषयीं तुम्ही निश्चित व्हाल, व चिरंतन कीर्ति संपादन कराल."

हिटलरपक्षाच्या व हिटलरी फौजेच्या पुढाऱ्यांचे हुकुम असे आहेत ! त्यांचा कार्यक्रम असा आहे ! या पुढाऱ्यांत माणुसकीचा अंशसुद्धां राहिलेला नाहीं, ते वन्य-पशूंच्या कोटीला जाऊन पोहोंचले आहेत !

आणि सदसद्विवेकबुद्धीला पारखे झालेले, लाजलज्जा गुंडाळून ठेवणारे, पशूंचें नीतिशास्त्र अंमलांत आणणारे, असे हे लोक उर्मटपणें जाहीर करीत आहेत कीं रशियन राष्ट्राचा उच्छाद केला पाहिजे ! प्लेखानोव व लेनिन, वेलिन्स्की व चेर्नीशेवस्की, पुश्किन व टॉलस्टॉय, ग्लिन्का व चेकोव्स्की, गोर्की व चेकोव, सेचेनेव व पाव्लोव, रेपिन् व सुरिकोव, सुवारोव व कुतिझोव, या नररत्नांचें थोर रशियन राष्ट्र हे लोक नष्ट करूं पाहात आहेत !

सोविएट यूनियनमधील सर्व राष्ट्रांच्या जनतेविरुद्ध 'संपूर्ण उच्छादाचें युद्ध' करावें, अशी जर्मन दरवडेखोरांची इच्छा आहे. ठीक, त्यांची इच्छा पूर्ण होईल, त्यांची इच्छा असेल तर संपूर्ण उच्छादाचें युद्ध त्यांना जरूर पाहावयास मिळेल !

आमच्या मातृभूमीच्या मुलुखांत घुसलेल्या जर्मन स्वारीवाल्यांचा संपूर्ण उच्छाद करणें, त्यांचा एकूणएक शिपाई कापून काढणें, हेंच यापुढें आमचें कार्य असणार !

जर्मन स्वारीवाल्यांना मुळींच दयामाया दाखवितां कामा नये !

## जर्मन साम्राज्यवाद्यांचा व त्यांच्या फौजांचा पराभव निश्चित

जर्मन दरवडेखोरांचा इतका नैतिक अधःपात झाला आहे कीं त्यांच्यांत माणुसकीचा लवलेशहि उरला नाहीं, ते केव्हांच वन्यपशूंच्या कोटीला जाऊन पोहोंचले आहेत, व याच गोष्टीवरून आपणांला निश्चितपणें दिसून येतें कीं त्यांचा सर्वनाश अपरिहार्य आहे.

परंतु हिटलरी दरवडेखोरांचा व त्यांच्या फौजांचा सर्वनाश या नैतिक कारणांखेरीज इतर कारणांमुळेंहि निश्चित झाला आहे.

हिटलरच्या लुटारू साम्राज्यशाहीचा अपरिहार्य पराभव समीपच्या भविष्यकाळांत घडवून आणण्यास कारणीभूत होणाऱ्या तीन मूलभूत गोष्टी आहेत, व दिवसेंदिवस त्या अधिकाधिक प्रभावी ठरत आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे साम्राज्यवादी जर्मनीच्या **यूरोपियन** पिछाडीचें अस्थैर्य, यूरपमधील 'नव्या राजवटी'चें अस्थैर्य. फ्रान्सपासून सोविएट बाल्टिक देशांपर्यंत, नॉर्वे, डेन्मार्क, बेल्ज्यम, हॉलंड व सोविएट श्वेतरशियापासून बाल्कन टापू व सोविएट यूक्रेनपर्यंत, यूरपखंडांतील निरनिराळ्या राष्ट्रांना जर्मन दरोडेखोरांनीं गुलाम बनविलें

आहे; त्यांनीं या देशांचे प्राथमिक लोकशाही स्वातंत्र्याचे हक्क हिरावून घेतले आहेत; त्यांनी या देशांचा स्वयंनिर्णयाचा हक्क काढून घेतला आहे; त्यांनी या देशांचें धान्य, मांस, व कच्चा माल लुबाडून नेला आहे; त्यांनीं या देशांतील लोकांना आपले गुलाम बनविलें आहे; त्यांनीं पोल, झेक, सर्व, वगैरे राष्ट्रांचा खून केला आहे, व यूरपमध्यें आपलें वर्चस्व प्रस्थापित करून त्याच्या पायावर सबंध जगभर जर्मनीचें वर्चस्व प्रस्थापित करण्याचा त्यांनीं चंग बांधला आहे. यालाच 'यूरपमधील नवी राजवट' असें नांव त्यांनीं दिलें आहे. परंतु हा 'पाया' कोणता ? ही 'नवी राजवट' म्हणजे काय ? ही यूरपमधील 'नवी राजवट' व तिचा कुजका 'पाया' म्हणजे एक ज्वालामुखी पर्वतच आहे, कोणत्या क्षणीं त्याचा स्फोट होईल व जर्मन साम्राज्यशाहीचा पत्त्यांचा बंगला कोसळून पडेल त्याचा नेम नाहीं; आत्मप्रशंसेंत मग्न झालेल्या हिटलरी मूर्खांनाच ही वस्तुस्थिति दिसणें अशक्य झालें आहे. ते नेपोलियनचा उल्लेख करतात, ते म्हणतात की हिटलर अगदीं नेपोलियनसारखा आहे व हुबेहुब नेपोलियनप्रमाणें कामगिरी करीत आहे. पण एकतर नेपोलियनची काय गत झाली हें त्यांनीं विसरूं नये; व दुसरें असें कीं बोका आणि सिंह यांच्यांत जेवढें साम्य असतें तेवढेंच हिटलर आणि नेपोलियन यांच्यांत आहे. कारण नेपोलियन प्रतिगामी शक्तींविरुद्ध लढत होता, त्यानें पुरोगामी शक्तींचा आधार घेतला होता; उलटपक्षीं हिटलरचें सामर्थ्य प्रतिगामी शक्तींच्या पाठिंब्यावर अवलंबून आहे, तो पुरोगामी शक्तींविरुद्ध लढत आहे. यूरपमधील जित राष्ट्रें हिटलरच्या जुलुमशाहीविरुद्ध उठाव करतील आणि लढतील, ही गोष्ट बर्लिनच्या बेवकूफ हिटलरी कंपूलाच कळूं शकत नाहीं. हिटलरच्या जुलुमशाहींतून सुटका करून घेण्यासाठीं यूरपमधील निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेनें चालविलेल्या लढ्याला सोविएट यूनियन, ग्रेट ब्रिटन, व युनायटेड स्टेट्स् यांचा पूर्ण पाठिंबा मिळेल, याविषयीं कोणाला संशय वाटणें शक्य आहे ?

दुसरी गोष्ट म्हणजे हिटलरी दरवडेखोरांच्या **जर्मन** पिछाडीचें अस्थैर्य. व्हर्साय तहनाम्यानें चिरफाड केलेल्या जर्मनीचें एकीकरण करण्यांत जोंपर्यंत हिटलरकंपू गुंतला होता, तोंपर्यंत त्याला जर्मन जनतेचा पाठिंबा मिळूं शकत होता, कारण जर्मनीचें पूर्ववैभव पुनः प्राप्त करून घ्यावें या ध्येयानें ही जनता प्रेरित झाली होती. परंतु हें ध्येय साध्य झाल्यानंतर हिटलरकंपूनें साम्राज्यवादाचा मार्ग स्वीकारला, परकीय मुलुख बळकाविण्यास व इतर राष्ट्रांना अंकित करण्यास सुरवात केली, व अशा रीतीनें यूरपमधील निरनिराळ्या राष्ट्रांना व सो. यू. मधील निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेला त्यानें आजच्या जर्मनीचे कट्टे वैरी बनविलें, व त्यामुळें जर्मन जनतेमध्यें सखोल हृदयपालट घडून आला, युद्ध चालू ठेवण्याला विरोध होऊं लागला, युद्ध बंद करण्याची मागणी करण्यांत येऊं लागली. दोन वर्षेंपर्यंत घनघोर युद्ध चालू आहे व तें संपण्याचीं कांहीं चिन्हें दिसत नाहींत; रक्ताचे पाट वाहात आहेत; लक्षावधि माणसांचा बळी देण्यांत आला आहे; उपासमार, दारिद्र्य, रोगराई, थैमान घालीत आहे; चोहों बाजूंनी

जर्मन-द्वेषाचें वातावरण पसरत आहे; हिटलरच्या निर्बुद्ध धोरणामुळें सो. यू. ची जनता आजच्या जर्मनीची दुष्मन वनली आहे;—या सर्व कारणांनीं जर्मनीची जनता या अनावश्यक व हानिकारक युद्धाला विरोध करण्यास प्रवृत्त व्हावी हें क्रमप्राप्तच होय. जर्मन सैन्याची युरोपियन पिछाडीच नव्हे, तर जर्मन पिछाडीसुद्धां एक ज्वालामुखी पर्वत वनली आहे व या ज्वालामुखीचा स्फोट होऊन साहसवाज हिटलरकंपूला तो केव्हां गिळंकृत करून टाकील त्याचा नेम नाहीं. हिटलरी मूर्खांनाच ही गोष्ट दिसणें अशक्य झालें आहे.

शेवटची गोष्ट म्हणजे सोविएट यूनियन, ग्रेट ब्रिटन व युनायटेड स्टेट्स् यांची एकजूट. ग्रेट ब्रिटन, युनायटेड स्टेट्स् व सोविएट यूनियन, यांनीं एकजूट केली आहे, त्यांचा दोस्तगट अस्तित्वांत आला आहे, व हिटलरी साम्राज्यवाद्यांचा आणि त्यांच्या लुटारू फौजांचा पराभव करण्याचें कार्य त्यांनीं शिरावर घेतलें आहे, हें अगदीं सत्य आहे. आधुनिक युद्ध हें यंत्रांचें युद्ध असतें, यंत्रोत्पादनांत जो अत्यंत श्रेष्ठ असेल त्यालाच या युद्धांत जय मिळेल. युनायटेड स्टेट्स्, ग्रेट ब्रिटन, व सोविएट यूनियन, यांचें यंत्रोत्पादन एकत्रित केलें तर तें जर्मनीच्या निदान तिप्पट होईल. हिटलरच्या लुटारू साम्राज्यशाहीचें मरण अपरिहार्य आहे याचें एक कारण हें होय.

मॉस्को येथें नुकतीच त्रि-राष्ट्र परिषद झाली; ग्रेट ब्रिटनतर्फे लॉर्ड बीव्हरब्रुक व युनायटेड स्टेट्स् तर्फे मि. हॅरिमन यांनीं या परिषदेंत भाग घेतला. या परिषदेनें आपल्या देशाला टँकांची व विमानाची पद्धतशीर मदत देण्याचें ठरविलें. या ठरावास अनुसरून यापूर्वींच आपणांला टँकें व विमानें मिळूं लागलीं आहेत हें तुम्हांला ठाऊक आहेच. अॅल्यूमिनियम, कथिल, जस्त, निकेल, रवर, वगैरे ज्या मालाचा आपल्या देशांत तुटवडा आहे असा माल आपणांला पुरविण्याचें आश्वासन ग्रे. ब्रिटनने या परिषदेपूर्वींच दिलें होतें. कांहीं दिवसापूर्वीं युनायटेड स्टेट्स्नें सोविएट सरकारला १०० कोटी डॉलर कर्ज देण्याचें ठरविलें ही गोष्ट आपण जमेस धरल्यास आपणांला असें खात्रीपूर्वक म्हणतां येईल कीं युनायटेड स्टेट्स्, ग्रेट ब्रिटन व सोविएट यूनियन यांचा दोस्तगट खरोखरींच अस्तित्वांत आला आहे, त्याची एकजूट वाढत आहे व वाढत राहील, व त्यामुळें आपलें सर्वांचें एकच ध्येय-दास्यविमोचन-सिद्धीस जाईल.

जर्मन फॅसिस्ट साम्राज्यशाहीच्या अपरिहार्य नाशाला कारणीभूत होणाऱ्या गोष्टी याच होत.

**आपलें कार्य**

लेनिननें सांगितलें आहे कीं युद्धें दोन प्रकारचीं असतात:-( १ ) लुटारू, अतएव अन्याय्य, युद्धें, व ( २ ) दास्यविमोचनाचीं युद्धें, न्याय्य युद्धें.

जर्मनीनें सध्यां चालविलेलें युद्ध लुटारू युद्ध आहे, तें अन्याय्य युद्ध आहे,

परकीय मुलुख बळकाविणें व इतर राष्ट्रांना अंकित करणें हा या युद्धाचा हेतु आहे. या कारणास्तव सर्व प्रामाणिक लोकांनीं जर्मन लुटारूंना दुष्मन समजून त्यांच्याविरुद्ध शस्त्र उपसलें पाहिचे.

सो. यू. नें. व सो. यू. च्या दोस्तांनीं चालविलेलें युद्ध हिटलरी जर्मनीच्या युद्धाहून निराळ्या प्रकारचें आहे. तें दास्यविमोचनाचें युद्ध आहे, तें न्याय्य युद्ध आहे, हिटलरनें गुलाम बनविलेल्या यूरपमधील निरनिराळ्या राष्ट्रांना व सो. यू. मधील निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेला हिटलरच्या जुलुमशाहींतून सोडविणें हा या युद्धाचा हेतु आहे. या कारणास्तव सर्व प्रामाणिक लोकांनीं सोविएट यूनियनच्या, ग्रेट ब्रिटनच्या व इतर दोस्तांच्या सैन्यांना दास्यविमोचन सैन्यें समजून त्यांना पाठिंवा दिला पाहिजे.

यूरपमधील म्हणा, किंवा अशियांतील-उदाहरणार्थ इराणांतील-म्हणा, कोणत्याही परकीय देशांतील मुलुख बळकाविणें व तेथील जनतेला अंकित करणें, हा मुळींच आपला युद्धहेतु नाहीं व असणें शक्य नाहीं. जर्मन फॅसिस्टांच्या जोखडांतून आपल्या मुलुखाची व आपल्या जनतेची मुक्तता करणें हाच आपला आद्य हेतु आहे.

यूरपमधील स्लाव राष्ट्रांवर व इतर जित राष्ट्रांवर आपली हुकमत व आपली राज्यपद्धति लादणें, हा मुळींच आपला युद्धहेतु नाहीं व असणें शक्य नाही. हीं राष्ट्रें आपल्या मदतीची अपेक्षा करीत आहेत. हिटलरच्या जुलुमशाहीविरुद्ध त्यांनीं जो दास्यविमोचनाचा लढा चालविला आहे त्या लढ्यांत त्यांना मदत करणें, व त्यानंतर त्यांनीं आपापल्या देशांत कोणत्या प्रकारें स्वतःच्या जीवनाची संघटना करावी हें स्वतः योग्य वाटेल त्याप्रमाणें ठरविण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावरच सोंपविणें, हाच आपला हेतु आहे. इतर राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारांत कोणत्याहि प्रकारची ढवळाढवळ करतां कामा नये !

पण हे हेतु जर साध्य करावयाचे असतील तर अगोदर आपण जर्मन स्वारी-वाल्यांचें लष्करी सामर्थ्य चिरडून टाकलें पाहिजे, आपल्या देशांत घुसलेल्या व आपल्या देशाला गुलाम बनवूं पाहणाऱ्या जर्मन फौजेंतील एकूणएक माणूस गारद केला पाहिजे.

परंतु यासाठीं आपल्या सैन्याला व आरमाराला आपल्या समग्र देशाचा सक्रिय व परिणामकारक पाठिंवा मिळाला पाहिजे; सर्व स्त्रीपुरुष कामगारांनीं व कचेऱ्यांतील नोकरांनीं कारखान्यांत उत्साहानें काम केलें पाहिजे व रणांगणावरील सैन्याला टॅंक, टॅंकवेधी बंदुका व तोफा, विमानें, तोफा, ट्रेंच–मॉर्टर, मशीनगन, बंदुका, दारूगोळा, वगैरेचा जास्तजास्त प्रमाणांत पुरवठा केला पाहिजे; आपल्या स्त्रीपुरुष सामुदायिक शेतकऱ्यांनीं शेतांत अधिक उत्साहानें काम केलें पाहिजे व रणांगणावरील सैन्याला आणि देशांतील जनतेला धान्य, मांस, कारखान्यांसाठीं लागणारा कच्चा माल यांचा

जास्त जास्त पुरवठा केला पाहिजे; आपल्या सैन्याशीं व आरमाराशीं सहकार्य करून संयुक्त युद्धतळ या नात्यानें स्वतःची संघटना केली पाहिजे व आपल्या देशाच्या इज्जतीचें व स्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठीं, जर्मन फौजांचा धुव्वा उडविण्यासाठीं, दास्यविमोचनाच्या महायुद्धांत भाग घेतला पाहिजे.

आजचें आपलें कार्य हें आहे.

हें कार्य आपण पार पाडूं शकतों व पार पाडलें पाहिजे.

हें कार्य जेव्हां आपण पार पाडूं व जर्मन स्वारीवाल्यांचा धुव्वा उडवूं, तेव्हांच आपणाला चिरंतन व न्याय्य शांततेची राजवट स्थापन करणें शक्य होईल.

**जर्मन स्वारीवाल्यांचा संपूर्ण पराभव होईपर्यंत लढा !**

**हिटलरी जुलुमशाहीच्या जोखडाखालीं हैराण झालेल्या सर्व दलित राष्ट्रांच्या दास्यविमोचनासाठीं लढा !**

**सोविएट यूनियन मधील सर्व राष्ट्रांचा अभेद्य स्नेहभाव चिरायु होवो !**

**लाल सैन्य व लाल आरमार चिरायु होवो !**

**आपला तेजस्वी देश चिरायु होवो !**

**आपली बाजू न्यायाची आहे ! विजयश्री आपणालाच माळ घालणार !**

—0—0—

७ नोव्हेंबर १९४१

# समग्र जनतेचें आशास्थान !

**मॉस्को येथें लाल चौकांत लाल फौजेच्या निदर्शनासमोर सरकारी संरक्षण समितीचा अध्यक्ष व सोविएट यूनियनचा संरक्षण-मंत्री या नात्यानें कॉ. स्टालिनचें भाषण.**

कॉमरेड्स, लाल फौजेंतील व लाल आरमारांतील लढवय्यांनों, अधिकाऱ्यांनों, राजकीय शिक्षकांनों, स्त्रीपुरुष कामगारांनों, सामुदायिक शेतकऱ्यांनों, बुद्धिजीवी नागरिकांनों, शत्रूच्या पिछाडीला कांहीं काळ पर्यंत जर्मन लुटारूंचें जोखड मानेवर बसलेल्या बंधुभगिनींनों, जर्मन फौजांची पिछाडी उध्वस्त करणाऱ्या आमच्या पराक्रमी स्त्रीपुरुष गनीमी वीरांनों !

सोविएट सरकारतर्फे व आपल्या बोल्शेविक पार्टीतर्फे महान् ऑक्टोबर क्रांतीच्या २४ व्या वाढदिवसानिमित्त मी अत्यंत विकट परिस्थितींत तुमचें अभिनंदन करतों. जर्मन लुटारूंच्या दगलबाज हल्ल्यामुळें व त्यांनीं आपल्यावर लादलेल्या युद्धामुळें आपल्या देशाला धोका उत्पन्न झाला आहे. आपण कित्येक प्रांत तात्पुरते गमावून बसलों आहोंत. दुष्मन लेनिनग्राडच्या व मास्कोच्या वेशीपर्यंत येऊन ठेपला आहे.

शत्रूचा असा अंदाज होता कीं आपल्या फौजेवर पहिला हल्ला होतांच तिची दाणादाण उडेल व आपल्या देशाला दांतीं तृण धरून शरण जावें लागेल. पण शत्रूचा अंदाज सपशेल चुकला. आपल्या फौजेला व आरमाराला जरी तात्पुरती माघार घ्यावी लागली, तरी सबंध आघाडीवर शत्रूचे हल्ले परतविण्याचें काम त्यांनीं शौर्यानें चालविलें आहे व आपल्या फौजेशीं व आरमाराशीं सहकार्य करून जर्मन स्वारीचा धुव्वा उडविण्यासाठीं आपल्या देशानें—आपल्या समग्र देशानें—स्वतःला एक जंगी तळ बनविलें आहे.

### तेवीस वर्षांपूर्वी

एक काळ असा येऊन गेला कीं जेव्हां आपल्या देशाची परिस्थिति आजच्यापेक्षांही अत्यंत विकट होती. १९१८ सालची आठवण करा. त्या वर्षीं आपण ऑक्टोबर

क्रांतीचा पहिला वाढदिवस साजरा केला. त्यावेळीं आपल्या देशाचा तीन चतुर्थांश भाग परदेशी आक्रमकांच्या ताब्यांत गेला होता. यूक्रेन, कॉकेशस, मध्यआशिया, उरल, सैबेरिया व अतिपूर्वप्रांत, एवढे टापू आपण तात्पुरते गमावून बसलों होतों. आपले दोस्त कुणीही नव्हते. आपणापाशीं लाल फौज नव्हती. लाल फौज अस्तित्वांत आणण्यास आपण नुकतीच सुरवात केली होती. आपणांकडे अन्नाची टंचाई होती, शस्त्रास्त्रांची टंचाई होती, कपड्यांची टंचाई होती. त्यावेळीं तर आपल्या देशावर चौदा राष्ट्रें तुटून पडलीं होतीं. पण आपण निराश झालों नाहीं, आपलें धैर्य खचलें नाहीं. युद्धाच्या वणव्यांत सांपडलों असतांनाच आपण लाल फौज संघटित केली व आपल्या देशाला लष्करी तळ बनविलें. आक्रमकांविरुद्ध लढण्यांत आपणाला महान् लेनिनकडून स्फूर्ति मिळाली. परिणाम काय झाला? आपण स्वारीवाल्यांचा धुव्वा उडवला, गमाविलेला सर्व मुलुख परत घेतला, आणि विजय संपादन केला.

**आणि आज**

आज आपल्या देशाची परिस्थिति २३ वर्षांपूर्वीं पेक्षां किती तरी अधिक चांगली आहे. उद्योगधंदे, अन्नसामुग्री व कच्चा माल या बाबतींत आपला देश २३ वर्षांपूर्वीं पेक्षां आज अनेक पटीनीं अधिक संपन्न आहे. आज आपणांला दोस्त मिळाले आहेत. जर्मन दरवडेखोरांविरुद्ध लढण्यासाठीं त्यांची व आपली एकजूट झाली आहे. फॅसिस्ट जुलुमशाहीचें जोखड मानेवर बसलेल्या यूरपमधील सर्व राष्ट्रांच्या जनतेची सहानुभूति व पाठिंबा आज आपणाला मिळत आहे. प्राणाचें मोल देऊन आपल्या देशाच्या व जनतेच्या स्वातंत्र्याचें रक्षण करणारी उत्कृष्ट फौज व आरमार आज आपणापाशीं आहे. अन्न, शस्त्रास्त्रें किंवा कपडे यांची आपणाला आज फारशी टंचाई भासत नाहीं. आपला सबंध देश, आपल्या देशांतील सर्व राष्ट्रांची जनता, आपल्या फौजेला व आरमाराला पाठिंबा देत आहे, जर्मन फॅसिस्टांच्या लुटारू फौजांचा धुव्वा उडविण्याच्या कामीं त्यांना मदत करीत आहे. आपले राखींव मनुष्यबळ अमर्याद आहे. २३ वर्षांपूर्वींप्रमाणें आज सुद्धां आपल्या देशभक्ति-प्रेरित युद्धांत महान् लेनिन व त्याचें विजयी निशाण आपणांला स्फूर्ति देत आहे.

मग, आपण जर्मन स्वारीवाल्यांचा पराभव करूं शकूं व करणारच या विषयीं शंका घेतां येईल काय?

**विजयाची खात्री**

कांहीं गर्भगळित व दुर्बळ बुद्धिजीवी लोकांना शत्रु फार प्रबळ वाटतो, पण तेवढा प्रबळ तो खचित नाहीं. हा सैतान जेवढा भयंकर रंगविण्यांत आला आहे तेवढा भयंकर तो खास नाहीं. जर्मन सैन्याची पुष्कळ स्तुति करण्यांत येते, पण त्याला आपल्या लाल फौजेनें अनेकदां जीव धरून पळायला लावलें आहे ही गोष्ट कुणाला नाकारतां येईल? जर्मन प्रचारकांच्या बढाईखोर विधानांवर विश्वास ठेवण्याऐवजीं

कुणी जर जर्मनीची खरीखुरी परिस्थिति लक्ष्यांत घेऊन विचार करील, तर जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांचा बोजवारा उडण्याची वेळ आहे हें समजणें त्याला कठीण जाणार नाहीं. जर्मनी आज उपासमार व दारिद्र्य यांच्या तावडींत सांपडला आहे. युद्धाच्या चार महिन्यांत जर्मनीचे ४५ लाख शिपाई कामास आले. जर्मनीचें रक्त खलास होत आहे व त्याचें मरण जवळ येत चाललें आहे. जर्मनीचें राखींव मनुष्यबळ संपुष्टांत येत आहे. जर्मन दरवडेखोरांचें जोखड मानेवर बसलेल्या यूरोपियन राष्ट्रांत, एवढेंच नव्हे तर जर्मन जनतेंतसुद्धां, बंडाची भावना उत्पन्न होऊं लागली आहे, कारण युद्ध अनिश्चित कालपर्यंत लांबणार असें जर्मन जनतेला वाटत आहे. जर्मन दरवडेखोर आपल्या अखेरच्या शक्तींचा उपयोग करीत आहेत. एवढा ताण जर्मनीला फारवेळ सहन करतां येणार नाहीं, यांत संशय नाहीं. आणखी कांहीं महिन्यांत—सहा महिन्यांत किंवा कदाचित एक वर्षात—जर्मनी स्वतःच्या पापांच्या भारानें चिरडून जाणार, त्याच्या ठिकऱ्या उडणार, हें निश्चित समजावें.

## दास्य विमोचनाचें युद्ध

कॉमरेड्स्, लाल फौजेंतील व लाल आरमारांतील सैनिकांनों, सेनाधिकाऱ्यांनों, राजकीय शिक्षकांनों, स्त्रीपुरुष गनीमी वीरांनों !

जर्मन दरवडेखोरांच्या लुटारू फौजांचा नायनाट करूं शकणारी शक्ति या नात्यानें तुमच्याकडे सबंध जगाचे डोळे लागून राहिले आहेत. जर्मन दरवडेखोरांचें जोखड मानेवर बसून गुलाम बनलेली यूरपच्या निरनिराळ्या राष्ट्रांतील जनता आपलें दास्य—विमोचन करणारे या नात्यानें तुमच्याकडे पहात आहे. दास्य—विमोचनाची प्रचंड जबादारी तुमच्या शिरावर येऊन पडली आहे. म्हणून या जबाबदारीला शोभणारा पराक्रम तुम्ही करून दाखवा. तुम्ही जें युद्ध लढत आहांत तें दास्यविमोचनाचें युद्ध आहे, तें न्याय्य युद्ध आहे. या युद्धांत आपल्या थोर पूर्वजांच्या—अलेक्झांडर नेव्स्की, दिमित्री दोन्स्कोइ, कुझमा मिनिन, दिमित्री पोझार्स्की, अलेक्झांडर सुवारोव, मिखेल कुतुझोव, यांच्या—पराक्रमी प्रतिमा तुमच्या डोळ्यांपुढें राहोत व तुम्हाला स्फूर्ति देवोत ! महान् लेनिनचें विजयी निशाण तुम्हांला ध्रुवताऱ्याप्रमाणें सतत मार्गदर्शक होवो !

**जर्मन स्वारीवाल्यांचा संपूर्ण नायनाट होईपर्यंत लढत रहा !**
**आपल्या मुलुखांत घुसणाऱ्या जर्मनांना जिवंत सोडूं नका !**
**आपली तेजस्वी मातृभूमि चिरायु होवो !**
**तिचें स्वातंत्र्य चिरायु होवो ! आपल्या जनतेचें स्वातंत्र्य चिरायु होवो !**
**लेनिनच्या झेंड्याखालीं—पुढें चला आणि विजय मिळवा !**

——0——0——

ता. २३ फेब्रुवारी १९४२

# लाल फौजेचा २४ वा वाढदिवस

**सोविएट यूनियनचा संरक्षण-मंत्री या नात्यानें कॉ. स्टालिननें काढलेलें 'आज्ञापत्र नं. ५५'.**

लाल फौजेंतील व लाल आरमारांतील सैनिकांनो, सेनाधिकाऱ्यांनो, राजकीय कार्यकर्त्यांनो, स्त्री-पुरुष गनीमी सैनिकांनो !

कॉम्रेड्स् ! आपल्या देशांतील जनता आज अत्यंत गंभीर परिस्थितींत लाल फौजेचा चोविसावा वाढदिवस साजरा करीत आहे. आज आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठीं घनघोर युद्ध चालू आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यावर निर्लज्ज व नीच आक्रमण करणाऱ्या, आपल्या देशाचें अस्तित्वच नष्ट करूं पाहणाऱ्या, फॅसिस्ट जर्मनी-विरुद्ध आपण लढत आहोंत. आपल्या देशांतून जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांची हकालपट्टी करण्यासाठीं, आपल्या देशाच्या इज्जतीचें व आझादीचें रक्षण करण्यासाठीं, लाल फौजेचे व लाल आरमाराचे योद्धे आर्क्टिक महासागरापासून काळ्या समुद्रापर्यंत पसरलेल्या विस्तीर्ण आघाडीवर निकरानें झुंजत आहेत.

शत्रूच्या हल्ल्यापासून आपल्या मातृभूमीचें रक्षण करण्याचा प्रसंग लाल फौजेवर आज पहिल्यांदाच आलेला नाहीं. आपल्या देशाची चिरफाड करूं पाहणाऱ्या व त्याचें स्वातंत्र्य नष्ट करूं इच्छिणाऱ्या परकीय हस्तक्षेपवाल्यांच्या फौजांविरुद्ध लढण्यासाठीं चोवीस वर्षांपूर्वी लाल फौज स्थापन करण्यांत आली. नवीनच जन्मास आलेल्या व रणांगणावर प्रथमच उतरणाऱ्या या लाल फौजेच्या पलटणींनीं ता. २३ फेब्रुआरी १९१८ रोजीं प्स्कोव् व नार्वा येथील लढायांत जर्मन स्वारीवाल्यांना पूर्णपणें चिरडून टाकलें. याच कारणास्तव हा दिवस लाल फौजेचा जन्मदिन ठरविण्यांत आला. त्यानंतरच्या काळांत परकीय स्वारीवाल्यांविरुद्ध लढतां लढतांच लाल फौजेनें आपलें संख्याबळ व सामर्थ्य वाढविलें. १९१८ सालीं जर्मन स्वारीवाल्यांविरुद्ध यशस्वी लढा करून तिनें आपल्या देशाचें रक्षण केलें व जर्मन फौजांना यूक्रेन व श्वेतरशियाच्या सरहद्दीपलीकडे हांकून लावलें. १९१९ ते १९२१ च्या काळांत दोस्तराष्ट्रांच्या परकीय फौजांविरुद्ध यशस्वी लढा करून तिनें आपल्या देशाचें रक्षण केलें व या फौजांनासुद्धां आपल्या देशाच्या सरहद्दीपलीकडे हांकून लावलें.

स्वकीय युद्धांत परकीय हस्तक्षेपवाल्या फौजांचा धुव्वा उडाल्यामुळें सोविएट यूनियनच्या जनतेला दीर्घकाल शांततेचा उपभोग घेतां आला, व शांततामय रचनेचें कार्य हातीं घेण्याची संधि मिळाली. शांततामय रचनेच्या वीस वर्षांच्या अवधींत आपल्या देशामध्यें समाजसत्तावादी उद्योगधंदे व सामुदायिक शेती अस्तित्वांत आली, विज्ञानाचा व संस्कृतीचा उत्कर्ष झाला, व आपल्या देशांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेचे परस्पर स्नेहसंबंध दृढ झाले. परंतु आपल्या देशावर दुष्मन पुनः एकदां हल्ला करण्याचा संभव आहे, या गोष्टीचा सोविएट जनतेला कधींच विसर पडला नाहीं. या कारणास्तव उद्योगधंद्यांची व शेतीची, विज्ञानाची व संस्कृतीची, जसजशी वाढ होत गेली, तसतसें सोविएट यूनियनचें लष्करी सामर्थ्यसुद्धां वाढत गेलें. दुसऱ्यांचे मुलुख लुबाडूं पाहणाऱ्या कित्येक लोकांना सोविएट यूनियनच्या या लष्करी सामर्थ्याचा चटका यापूर्वींच बसला आहे, व त्यामुळें रडत बसण्याची पाळी आली आहे. अजिंक्य म्हणून डांगोरा पिटण्यांत आलेल्या जर्मन फॅसिस्ट फौजेलासुध्दां या सामर्थ्याचा चटका आज बसत आहे.

आठ महिन्यांपूर्वीं फॅसिस्ट जर्मनीनें निर्लज्जपणें व नीचपणें अनाक्रमण–कराराचा भंग करून आपल्या देशावर दगलबाजपणें स्वारी केली. शत्रूचा असा अंदाज होता कीं पहिल्या घावासरशींच लाल फौज छिन्नविच्छिन्न होईल व तिची प्रतिकारशक्ति नष्ट होईल. परंतु शत्रूचा अंदाज सपशेल चुकला. लाल सैन्याचें सामर्थ्य त्यानें जमेस धरलें नाहीं, सोविएट पिछाडीची भक्कम एकजूट त्यानें जमेस धरली नाहीं, आपल्या देशांतील सर्व राष्ट्रांच्या जनतेचा विजय मिळविण्याचा निर्धार त्यानें जमेस धरला नाहीं, फॅसिस्ट जर्मनीच्या युरोपियन पिछाडीचा पोकळपणा त्यानें जमेस धरला नाहीं, फॅसिस्ट जर्मनीची व जर्मन फौजेची सुध्दां अंतर्गत कमजोरी त्यानें जमेस धरली नाहीं.

## लाल फौजेची चढाई

जर्मन फॅसिस्टांनीं अवचितपणें व अचानकपणें हल्ला केल्यामुळें लाल फौजेला पहिल्या कांहीं महिन्यांत माघार घेणें व सोविएटचा कांहीं मुलुख सोडून देणें भाग पडलें. परंतु माघार घेतांनासुध्दां लाल फौजेनें शत्रूवर निकराचे प्रहार केले व त्याच्या सैन्याचें सामर्थ्य खची केलें. ही माघार केवळ तात्पुरती आहे, शत्रूला लवकरच आपण थोपवूं व त्यानंतर त्याला लोळवूं, याबद्दल लाल फौजेंतील सैनिकांना व आपल्या देशांतील जनतेला तिळमात्र शंका नव्हती.

युद्धाच्या क्रमांतच लाल फौजेमध्यें नव्या चैतन्ययुक्त शक्तींची भर पडली. तिला मनुष्यबळाचा व युद्धसामुग्रीचा नवा पुरवठा मिळाला, नव्या राखींव पलटणी तिच्या मदतीला आल्या. विस्तीर्ण आघाडीच्या प्रमुख विभागांत लाल फौजेनें चढाई सुरू करण्याची वेळ अखेरीस येऊन ठेपली. रोस्तोव आणि तिखविन येथें, क्राइमियांत व मॉस्कोच्या दारांत, जर्मन फॅसिस्ट फौजांना लाल फौजेनें थोड्याच अवधींत अनेकदां

चोप दिला. मॉस्कोनजीकच्या घनघोर लढायांत लाल फौजेनें सोविएट राजधानीला वेढा घालूं पाहणाऱ्या जर्मन फॅसिस्ट पलटणींचा धुव्वा उडविला, त्यांना मॉस्कोच्या वेशींतून पिटाळून लावलें, व अजूनहि लाल फौज त्यांचा पाठलाग करीत आहे, त्यांना पश्चिमेकडे रेंटीत आहे. मॉस्को व तुला प्रांतांतून व इतर प्रांतांतील शत्रूनें कांहीं काळ हस्तगत केलेल्या शेंकडों खेड्यांतून व कित्येक शहरांतून जर्मन स्वारीवाल्यांना पूर्णपणें हुसकावून लावण्यांत आलें आहे.

दगलबाजपणें अचानक हल्ला केल्यामुळें जर्मनांना आरंभींच्या महिन्यांत लष्करी-दृष्ट्या जी अनुकूलता मिळाली होती ती आतां त्यांना राहिली नाहीं. जर्मन फॅसिस्ट फौजेच्या हातांतील अनपेक्षितपणाचें शस्त्र आतां अगदीं बोथट होऊन गेलें आहे. जर्मन फॅसिस्ट हल्ल्याच्या अचानकपणामुळें उभयपक्षांच्या परिस्थितींत जी विषमता निर्माण झाली होती ती आतां संपली आहे. यापुढें युद्धाचा निर्णय अचानक हल्ल्या-सारख्या क्षणिक गोष्टींवरून ठरणार नाहीं; पिछाडीचें स्थैर्य, सैन्याची हिंमत, सैन्यांतील पलटणींची संख्या व त्यांचें कौशल्य, शस्त्रसामुग्री, सेनाधिकाऱ्यांचें संघटनाचातुर्य,—असल्या चिरकालिक महत्त्वाच्या गोष्टींनींच युध्दाचा निर्णय ठरणार आहे. या ठिकाणीं एक मुद्दा नीट लक्षांत घेतला पाहिजे व तो हा कीं, जर्मनांच्या शस्त्रागारांतून अनपेक्षित-पणाचें हत्यार नाहींसें होतांच जर्मन फॅसिस्ट सैन्याचा सर्वनाश होण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे.

जर्मन फॅसिस्टांना स्वतःचें सैन्य अजिंक्य वाटतें, ते बढाई मारतात कीं 'एकाच लढाईत आम्ही लाल फौजेचा धुव्वा उडवूं.' सध्यां लाल फौज व जर्मन फॅसिस्ट फौज यांमध्यें द्वंद्व चालू आहे, इतकेंच नव्हे तर जर्मन फॅसिस्ट फौजेला रणांगणावर इटालियन, रुमानियन व फिनिश फौजांचा पाठिंबा मिळत आहे. लाल फौजेला अद्यापपावेतों असा पाठिंबा कुणाकडून मिळत नाहीं. तरीसुध्दां काय आढळून येतें? अवास्तव स्तुति करण्यांत येणाऱ्या जर्मन फौजेला हार खावी लागत आहे, व लाल फौज महत्त्वाचे विजय मिळवीत आहे. लाल फौजेची वज्रमुष्टि छातीवर बसल्यामुळें जर्मन पलटणींचे डोळे पांढरे होऊन त्या पश्चिमेकडे कोलमडून पडत आहेत, त्यांच्या सैनिकांचा व शस्त्रसामुग्रीचा भयंकर संहार होत आहे. ठिकठिकाणीं बचावाची रांग करून तिला चिकटून राहण्याचा व आजचें मरण उद्यांवर ढकलण्याचा प्रयत्न जर्मन फौज करीत आहे. पण शत्रूचा हा सर्व खटाटोप व्यर्थ आहे. प्रथमप्रहाराची संधि (initiative) आतां आमच्या हातीं आली आहे, आणि हिटलरच्या गंजलेल्या भंगलेल्या लष्करी यंत्रानें कितीहि धडपड केली तरी लाल फौजेच्या आघातापुढें त्याचा टिकाव लागणें शक्य नाहीं. थोड्याच दिवसांत लाल फौज पाशवी शत्रूवर जोराचा प्रहार करून त्याला लेनिनग्राड जवळून मागें हटवील व श्वेतरशिया, यूक्रेन, लिथुएनिया, लाटविया, एस्तोनिया, कॅरलिया, या टापूंतून त्याची हकालपट्टी करील, सोविएट क्राइमिया

त्याच्या तावडींतून सोडवील, व त्यानंतर विजयी लाल निशाण पुनः एकदां समग्र सोविएट भूमीवर फडकूं लागेल.

## लाल फौजेचें उदात्त ध्येय

तथापि आतांपर्यंत जे विजय मिळाले आहेत तेवढ्यानें समाधान मानणें, व जर्मन फौजेची आतांच इतिश्री झाली आहे असें समजणें, हा अक्षम्य अदूरदर्शीपणा होईल. अशा प्रकारें पोकळ डौल मिरविणें, वृथाभिमान बाळगणें, सोविएट जनतेला शोभणार नाहीं. अद्यापि अनेक अडचणींचे डोंगर समोर उभे आहेत हें विसरतां कामा नये. शत्रू हार खात आहे, पण अजून तो चीत झालेला नाहीं, आणि अर्थातच अजून तो ठार झालेला नाहीं. अजून तो प्रबळच आहे. विजय मिळविण्यासाठीं तो आपली उरली-सुरली सर्व शक्ति एकवटण्यास चुकणार नाहीं. जसजसा त्याचा पराभव होईल, तसतसा तो अधिक पशुतुल्य वर्तन करीत राहील. या कारणास्तव रणांगणावरील फौजेच्या मदतीसाठीं राखींव फौजा शिकवून तयार करण्याच्या आपल्या कार्यांत क्षणभरहि शिथिलता येतां कामा नये. संतापानें बेफाम झालेल्या शत्रूविरुद्ध विजय मिळविण्यासाठीं रणांगणावर नव्यानव्या पलटणी रवाना करणें आवश्यक आहे. आपले उद्योगधंदे—विशेषतः युद्धोपयोगी कारखानें—दुप्पट जोरानें चालणें आवश्यक आहे. टँक, विमानें, तोफा, ट्रेंच—मॉर्टर, मशीनगन, बंदुकी, दारूगोळा, वगैरे साहित्य रणांगणावर दररोज जास्त जास्त प्रमाणांत रवाना होणें आवश्यक आहे.

लाल फौजेच्या सामर्थ्याचें एक मुख्य रहस्य हें होय. परंतु लाल फौजेचें सामर्थ्य केवळ एवढ्यावरच अवलंबून नाहीं.

लाल फौजेच्या सामर्थ्याचें सर्वांत मुख्य रहस्य असें कीं तिनें चालविलेलें युद्ध लुटारू साम्राज्यशाही युद्ध नसून तें स्वदेशरक्षणाचें युद्ध आहे, तें दास्यविमोचनाचें युद्ध आहे, तें न्याय्य युद्ध आहे. जर्मन स्वारीवाल्यांना आपल्या सोविएट भूमींतून हुसकावून लावणें; युद्धपूर्व काळांत स्वातंत्र्याचा उपभोग घेणाऱ्या व माणसांप्रमाणें जीवन कंठणाऱ्या, परंतु सध्या गांजणूक, लुबाडणूक, उपासमार, यांनीं हैराण होणाऱ्या, आपल्या निरनिराळ्या खेड्यांतील व शहरांतील जनतेला जर्मन स्वारीवाल्यांच्या जोखडांतून मुक्त करणें; व जर्मन फॅसिस्ट दैत्यांच्या बलात्कारापासून व अत्याचारां-पासून आपल्या देशांतील स्त्रियांची सोडवणूक करणें;—हेंच लाल फौजेचें कार्य आहे. याहून अधिक उच्च, अधिक उदात्त, दुसरें कोणतें कार्य असणार ? कोणताहि जर्मन सैनिक 'मी न्याय्य युध्दांत भाग घेत आहे' असें म्हणूं शकत नाहीं, कारण परकीय जनतेला लुबाडण्यासाठीं व गांजण्यासाठींच त्याला युध्दांत खेंचण्यांत आलें आहे व ही गोष्ट त्याच्या लक्ष्यांत न येणें शक्य नाहीं. प्रस्तुत युध्दांत जर्मन सैनिकापुढें असें कोणतेंहि उच्च व उदात्त ध्येय नाहीं कीं ज्यामुळें त्याला स्फुरण चढावें, ज्याबद्दल त्याला अभिमान वाटावा. उलटपक्षीं लाल फौजेंतील कोणताहि सैनिक अभिमानानें सांगूं शकतो कीं 'मी

ज्या युध्दांत भाग घेत आहे तें न्याय्य युध्द आहे, तें दास्यविमोचनाचें युध्द आहे, तें माझ्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याचें युध्द आहे.' प्रस्तुत युध्दांत लाल फौजेपुढें उच्च व उदात्त ध्येय आहे, व म्हणून प्रचंड पराक्रम करून दाखविण्यासाठीं तिला स्फुरण चढत आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्राणाचें बलिदान करण्यास तयार होणारे हजारों स्त्री-पुरुष वीर आपल्या प्रस्तुत देशभक्तिप्रेरित युध्दांत उदयास येत आहेत, याचें कारण हेंच होय.

लाल फौजेच्या सामर्थ्याचें रहस्य हेंच होय.

जर्मन फॅसिस्ट फौजेच्या कमकुवतपणाचें रहस्यसुध्दां हेंच होय.

### जर्मन-द्वेष नव्हे, तर फॅसिस्ट-द्वेष !

परदेशांतील वर्तमानपत्रांत मधूनमधून अनेक दंतकथा प्रसिध्द होत असतात; उदाहरणार्थ असें जाहीर करण्यांत येतें कीं 'जर्मन राष्ट्राचा उच्छाद करणें व जर्मनीचें स्वतंत्र राज्य नष्ट करणें हेंच लाल फौचेचें ध्येय आहे.' या दंतकथेंत अर्थातच कांहीं तथ्य नाहीं, लाल फौजेची बदनामी करण्याचाच हा बेवकूफ डाव आहे. लाल फौज असल्या वेडगळ ध्येयासाठीं लढत नाहीं, व लढणें शक्य नाहीं. आपल्या देशांत घुसलेल्या जर्मनांना हुसकावून लावणें, सोविएट भूमींतूत जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांची हकालपट्टी करणें, हेंच लाल फौजेचें ध्येय आहे. सोविएट भूमीला दास्यमुक्त करण्याच्या या युध्दाचा बहुधा असा परिणाम होईल कीं हिटलर कंपूला जर्मनींतून गचांडी मिळेल किंवा त्याचा नायनाट होईल. असा परिणाम झाल्यास आपणांला आनंदच वाटला पाहिजे. परंतु हिटलर कंपू म्हणजेच जर्मन राष्ट्र, हिटलरकंपू म्हणजेच स्वतंत्र जर्मन राज्य, असें समजणें हास्यास्पद होय. एकामागून एक निरनिराळे हिटलर उगवतात आणि मावळतात, पण जर्मन राष्ट्र व जर्मन राज्य मात्र कायम राहतें, अशीच इतिहासाची साक्ष आहे.

लाल फौजेच्या सामर्थ्याचें शेवटचें रहस्य असें कीं तिला इतर राष्ट्रांतील जनतेविषयीं—जर्मन जनतेविषयींसुध्दां—ती निराळ्या वंशाची आहे एवढ्या कारणास्तव द्वेष वाटत नाहीं; सर्व राष्ट्रांचें व सर्व वंशांचे लोक समान आहेत, इतर राष्ट्रांच्या हक्कांचें रक्षण केलें पाहिजे, अशीच तिला शिकवण देण्यांत आली आहे. जर्मनांचा 'वंशभेदाचा सिध्दांत' (racial theory) व इतर वंशांच्या लोकांचा द्वेष करण्यांची त्यांची प्रवृत्ति यांमुळें सर्व स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांचे लोक फॅसिस्ट जर्मनीचे शत्रू बनले आहेत. सोविएट यूनियनचा 'वंशसमतेचा सिध्दांत' (racial equality) व इतर राष्ट्रांच्या हक्कांचें रक्षण करण्याची प्रवृत्ति यांमुळें सर्व स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांचे लोक सोविएट यूनियनचे दोस्त बनले आहेत.

लाल फौजेच्या सामर्थ्याचें रहस्य हें होय.

जर्मन फॅसिस्ट फौजेच्या कमजोरीचें रहस्यसुध्दां हें होय.

परदेशांतील वर्तमानपत्रांत मधूनमधून अशा प्रकारच्या दंतकथा प्रसिध्द होत असतात कीं ' सोविएट जनतेला जर्मनांविषयीं ते केवळ जर्मन आहेत म्हणून द्वेष वाटतो, जर्मनींचें जें जें कांहीं असेल त्याविषयीं लाल फौजेला द्वेष वाटतो, या द्वेषामुळें लाल फौज जर्मन सैनिकांना ते केवळ जर्मन आहेत म्हणून ठार करते, व म्हणून लाल फौज जर्मन सैनिकांना कैद करण्याच्या भानगडींत पडत नाहीं. या दंतकथेतसुध्दां अर्थात्च कांहीं तथ्य नाहीं, हासुध्दां लाल फौजेची वदनामी करण्याचाच वेवकूफ डाव आहे लाल फौजेंत वंशद्वेषाच्या भावनेचा लवलेशहि आढळणार नाहीं. असल्या अधोगति-कारक भावना तिच्यांत मुळींच आढळत नाहींत, कारण सर्व वंशांचे लोक समान आहेत व इतर राष्ट्रांच्या हक्कांचें रक्षण केलें पाहिजे अशीच तिला शिकवण देण्यांत आली आहे. आपल्या देशांत कुणीहि वंशद्वेषाचें प्रदर्शन केल्यास तो गुन्हा समजण्यांत येतो व त्याला सजा करण्यांत येते ही गोष्ट विसरूं नये.

## शरणागतांना जीवदान, राक्षसांचा संहार !

जर्मन फॅसिस्ट स्वारीवाले आमच्या देशाला गुलाम बनवूं पाहात आहेत, त्याअर्थी जेव्हां ते आमच्या सैन्याच्या तावडींत सांपडतात व शस्त्रें खालीं ठेवण्याचें व शरण येण्याचें नाकारतात तेव्हां त्यांचा संहार करणें हें अर्थात् लाल फौजेचें कर्तव्यच आहे. ते जर्मन वंशाचे आहेत म्हणून नव्हे, तर ते आमच्या देशाला गुलाम बनवूं पहात आहेत म्हणूनच, लाल फौज त्यांचा संहार करते. आपल्या मातृभूमीला गुलाम बनवूं पाहणाऱ्या प्रत्येकाला—मग तो कोणत्याहि राष्ट्राचा असो—ठार करणें, हें प्रत्येक देशाच्या फौजेचें कर्तव्य आहे, हा प्रत्येक देशाच्या फौजेचा हक्क आहे, आणि हें लाल फौजेचेंसुध्दां कर्तव्य आहे, हा लाल फौजेचासुध्दां हक्क आहे. कांहीं दिवसांपूर्वीं कालिनिन, क्लिन, सुखिनिची, आंद्रिआपोल, व तोरेपेत्झ, या शहरांतील जर्मन पलटणींना आपल्या सैन्यानें वेढा दिला, व त्यांना शरण येण्यास सांगितलें, शरण आल्यास जीवदान मिळेल असें त्यांना आपल्या सैन्यानें वचन दिलें. जर्मन पलटणींनीं शस्त्रें खालीं ठेवण्याचें व युध्दकैदी बनण्याचें नाकारलें. अर्थात् त्यांना जबरदस्तीनें पिटाळून लावणें प्राप्तच होतें हें उघड होय, व तसें करतांना वरेचसे जर्मन ठार झाले. युध्द म्हणजे युध्द ! जर्मन सैनिक व सेनाधिकारी जर शरण आले तर लाल फौज त्यांना कैद करते व जीवदान देते. जर्मन सैनिकांनीं व सेनाधिऱ्यांनीं जर शस्त्रें खालीं ठेवण्याचें नाकारलें व शस्त्रांच्या जोरावर आमच्या देशाला गुलाम बनविण्याचा उद्योग चालू ठेवला, तर लाल फौज त्यांचा संहार करते. थोर रशियन लेखक माक्सिम गोर्की याचे शब्द ध्यानांत ठेवा :—"जर शत्रू शरण आला नाहीं तर त्याचा संहार केला पाहिजे !"

कॉम्रेड्स, लाल फौजेतील सैनिकांनों, लाल खलाश्यांनों, सेनाधिकाऱ्यांनों, राजकीय कार्यकर्त्यांनों, स्त्री-पुरुष गनीमी वीरांनों !

लाल फौजेच्या चोविसाव्या वाढदिवसानिमित्त मी तुमचें अभिनंदन करतों ! जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांविरुध्द तुम्हांला संपूर्ण विजय मिळो !

**लाल फौज व लाल आरमार चिरायु होवो !**

**स्त्री-पुरुष गनीमी सैनिक चिरायु होवोत !**

**आपली तेजस्वी मातृभूमि चिरायु होवो ! तिचें स्वातंत्र्य चिरायु होवो ! आपल्या जनतेचें स्वातंत्र्य चिरायु होवो !**

**आपणांला यशाच्या मार्गानें पुढें नेणारी महान् बोल्शेविक पार्टी चिरायु होवो !**

**महान् लेनिनचा अजिंक्य झेंडा चिरायु होवो !**

**लेनिनच्या झेंड्याखालीं पुढें चला—आणि जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांचा धुव्वा उडवा !**

**जे. स्टालिन**

**सोविएट यूनियनचा संरक्षणखात्याचा**
**जनता-कोमिसार**

—०—०—

ता. १ मे १९४२

# मे–दिनाचा संदेश

**सोविएट यूनियनचा संरक्षण-मंत्री या नात्यानें कॉ. स्टालिननें काढलेलें ' आज्ञापत्रक नं. १३० '**

कॉम्रेड्स, लाल फौजेंतील व लाल आरमारांतील सैनिकांनों, सेनाधिकाऱ्यांनों, राजकीय शिक्षकांनों, स्त्री-पुरुष गनीमी वीरांनों, स्त्रीपुरुष कामगारांनों, स्त्री-पुरुष शेतकऱ्यांनों, बौध्दिक कार्य करणाऱ्या लोकांनों, जुलुमी जर्मनांचें जोखड तात्पुरतें मानेवर बसलेल्या जर्मन पिछाडीवरील बंधुभगिनींनों !

मे-दिनानिमित्त सोविएट सरकारतर्फे व आपल्या बोल्शेविक पार्टीतर्फे मीं तुमचें अभिवादन व शुभचिंतन करतों.

कॉम्रेड्स ! यंदांच्या आंतरराष्ट्रीय मे-दिन उत्सवप्रसंगीं आपल्या देशांतील जनता फॅसिस्ट स्वारीवाल्यांविरुद्ध मातृभूमीचें रक्षण करण्यांत व्यग्र झाली आहे. आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर या युध्दाचा ठसा उमटला आहे. आजच्या १ मेच्या उत्सवदिनावरसुद्धां त्याचा ठसा उमटला आहे. आपण युध्दांत गुंतलों असल्यामुळें आपल्या देशांतील कामगारांनीं आज रजा न घेतां देशाच्या बचावासाठीं जोरानें काम करून आजचा दिवस साजरा करण्याचें ठरविलें आहे. रणांगणावर लढणाऱ्या सैनिकांच्या जीवनाशीं समरस होऊन त्यांनीं हा १ मेचा उत्सव-दिन 'श्रमाचा व लढ्याचा दिवस' म्हणून साजरा केला आहे; हेतु असा कीं रणांगणावरील फौजेला जास्तींत जास्त मदत करतां यावी, तिला रायफल, मशीनगन, तोफा, ट्रेंच-मॉर्टर, टँक, विमानें, दारूगोळा, रोटी, मांस, मासळी, भाजीपाला, वगैरेंचा जास्तींत जास्त पुरवठा करतां यावा.

याचा अर्थ हाच कीं आपल्या देशांत रणांगणावरील सैनिक व पिछाडीवरील जनता मिळून एक संयुक्त व अविच्छेद्य युध्दतळ बनला आहे, शत्रूवर विजय मिळवि-

ण्याच्या मार्गांत ज्या ज्या अडचणी येतील त्या सर्व बाजूला सारण्यास दोघांचीहि जय्यत तयारी आहे.

## जर्मन फॅसिस्टांचें स्वरूप

कॉम्रेड्स! जर्मन फॅसिस्ट आक्रमकांनीं यूरपखंडाला युध्दाच्या खाईंत लोटलें त्या प्रसंगाला दोन वर्षें होऊन गेलीं आहेत; एवढ्या अवधींत त्यांनीं यूरपखंडांतील स्वातंत्र्यप्रेमी देश–फ्रान्स, नॉर्वे, डेन्मार्क, बेल्ज्यम, हॉलंड, झेकोस्लवेकिया, पोलंड, युगोस्लाविया, ग्रीस–पादाक्रांत केले, व जर्मन बँकवाल्यांची तिजोरी भरण्यासाठीं या देशांचें रक्त शोषून घेण्यास सुरवात केली. जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांनीं आपल्या देशावर बेमुर्वतपणें व दगलबाजपणें हल्ला केला व आपलीं खेडीं व शहरें लुटण्यास व बेचिराख करण्यास सुरवात केली, एस्तोनिया, लाटविया, लिथुएनिया, श्वेतरशिया, यूक्रेन, मोल्देविया, येथील शांतताप्रिय जनतेवर अत्याचार करण्याचें व तिची कत्तल करण्याचें सत्र आरंभिलें, त्या प्रसंगाला दहा महिने होऊन गेले आहेत. गेले दहा साडेदहा महिने आपल्या देशांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेनें पशुतुल्य शत्रूविरुद्ध देशभक्तिप्रेरित युद्ध चालविलें आहे व आपल्या देशाच्या इज्जतीचें व आजादीचें रक्षण केलें आहे. या काळांत आपणांला जर्मन फॅसिस्टांचें अंतरंग बारकाईनें न्याहाळून पाहण्याची, त्यांचे खरे उद्देश समजून घेण्याची, त्यांच्या वल्गनांवरून नव्हे तर युद्धांतील प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारें–जगजाहीर घटनांच्या आधारें–त्यांच्या खऱ्या स्वरूपाचें आकलन करण्याची, संधि मिळाली आहे.

मग, हे आपले दुष्मन–हे जर्मन फॅसिस्ट–आहेत तरी कोण? त्यांचें स्वरूप काय आहे? या बाबतींत युध्दाच्या अनुभवावरून आपण शिकावयाचें?

## बँकवाल्यांचे पाळींव कुत्रे

असें सांगण्यांत येतें कीं जर्मन फॅसिस्ट हे 'राष्ट्रवादी' आहेत, इतर देशांच्या हल्ल्यापासून जर्मनीच्या अखंडपणाचें व स्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठींच ते लढत आहेत. अर्थातच ही निवळ थाप आहे. नॉर्वे, डेन्मार्क, बेल्ज्यम, हॉलंड, ग्रीस, सोविएट यूनियन, वगैरे स्वातंत्र्यप्रेमी देशांनीं जर्मनीचा अखंडपणा मोडून टाकण्याचा व जर्मनीचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रयत्न केला, असें विधान केवळ लुच्चे लोकच करूं शकतील. वस्तुतः जर्मन फॅसिस्ट हे 'राष्ट्रवादी' नसून साम्राज्यवादी आहेत. जर्मन बँकवाल्यांच्या व धनिकशाहीच्या तिजोऱ्या भरण्यासाठीं ते दुसऱ्यांच्या देशांवर झडप घालतात व त्यांचें रक्त शोषून घेतात. जर्मन फॅसिस्टांचा म्होरक्या गोअरिंग हा एक प्रमुख बँकवाला व भांडवलदार आहे व अनेक गिरण्या कारखान्यांतून तो नफा काढीत आहे, ही गोष्ट सुप्रसिध्द आहे. हिटलर, गोएबेल्स, रिबेनट्रोप, हिमलर, वगैरे आजचे जर्मनीचे राज्यकर्ते जर्मन बँकवाल्यांचे पाळींव कुत्रे आहेत, इतर कुणाच्याहि

हिताची पर्वा न करतां जर्मन बँकवाल्यांच्या हिताची राखण करणें हेंच त्यांचें कार्य आहे. आपल्या हातांतील एक आंधळें हत्यार या नात्यानें हे लोक जर्मन सैन्याचा उपयोग करीत आहेत; जर्मन फौजेला स्वतःचें व इतरांचें रक्त सांडण्यास, स्वतःला व इतरांना घायाळ करण्यास, या लोकांनीं आज्ञा केली आहे, ती जर्मनीच्या हितासाठीं नसून जर्मन बँकवाल्यांची व धनिकशाहीची तुंबडी भरण्यासाठींच.

युद्धाच्या अनुभवावरून आपणांला हेंच कळून येतें.

## सरंजामशाहीचे पुरस्कर्ते

असें सांगण्यांत येतें कीं जर्मन फॅसिस्ट हे समाजसत्तावादी आहेत, भांडवल-दारांविरुद्ध कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या हिताचें रक्षण करण्यासाठींच ते झटत आहेत. ही अर्थात्च निवळ थाप आहे. जर्मनीच्या व जितराष्ट्रांच्या गिरण्याकारखान्यांत ज्यांनीं पुरातन गुलामगिरीची पद्धत सुरू केली आहे, खेड्यांत ज्यांनीं पुनः भूदासपद्धति अस्तित्वांत आणली आहे, अशा जर्मन फॅसिस्टांना कामगारांचें व शेतकऱ्यांचे कैवारी म्हणणें केवळ लुच्च्या लोकांनाच शक्य आहे. जर्मन फॅसिस्टांनीं स्थापन केलेल्या गुलामगिरीच्या पद्धतीमुळें व भूदासपद्धतीमुळें कामगारांचा व शेतकऱ्यांचा मुळींच फायदा होत नसून जर्मन भांडवलदारांचा व बँकवाल्यांचाच फायदा होतो, ही गोष्ट फक्त बेशरम भामटेच नाकबूल करूं शकतील. वस्तुतः जर्मन फॅसिस्ट हे सरंजाम-शाहीचा पुरस्कार करणारे प्रतिगामी लोक आहेत, व जर्मन फौज ही सरंजामदारांचीच फौज आहे. जर्मन उमरावांचें वैभव वाढविण्यासाठींच, जमीनदारांची सत्ता पुनः स्थापन करण्यासाठींच, त्यांनीं रक्तपात सुरू केला आहे.

युद्धाच्या अनुभवावरून आपणांला हेंच कळून येतें.

## पुरोगामी संस्कृतीचे वैरी

असें सांगण्यांत येतें कीं जर्मन फॅसिस्ट हे युरोपियन संस्कृतीचे दूत आहेत, इतर देशांत या संस्कृतीचा प्रसार करण्यासासाठींच ते युद्ध करीत आहेत. ही अर्थात्च निवळ थाप आहे. सबंध यूरपला फांशीच्या खांबांचें जंगल बनविणारे, शांतताप्रिय नागरिकांना लुबाडणारे व त्यांच्यावर अत्याचार करणारे, शहरें व खेडीं जाळून बेचिराख करणारे, यूरपच्या निरनिराळ्या राष्ट्रांतील सांस्कृतिकदृष्ट्या मूल्यवान असलेल्या वस्तु नष्ट करणारे, असे हे जर्मन फॅसिस्ट युरोपियन संस्कृतीचे दूत बनूं शकतात, हें विधान करणें धंदेवाईक भामट्यांनाच शक्य आहे. वस्तुतः जर्मन फॅसिस्ट हे युरोपियन संस्कृतीचे वैरी आहेत, जर्मन फौज ही मध्ययुगीन प्रतिगामी राजवटीची फौज आहे, युरोपियन संस्कृतीची होळी करणें व तिच्या ऐवजीं गुलामगिरीवर अधिष्ठित झालेली जर्मन बँकवाल्यांची व उमरावांची 'संस्कृति' अस्तित्वांत आणणें हेंच तिचें कार्य आहे.

युद्धाच्या अनुभवावरून आपणांला हेंच कळून येतें.

शत्रूनें पांघरलेला बुरखा जर आपण फेडला व युद्धांतील अनुभवांच्या प्रकाशांत जर त्याचा चेहरा आपण न्याहाळून पाहिला, तर त्याचें हें काळेंकुट्ट स्वरूप नजरेस पडतें.

परंतु युध्दाच्या अनुभवावरून फक्त एवढ्याच गोष्टी कळतात असें नाहीं. युध्दाच्या अनुभवावरून आणखी असें दिसून येतें कीं या युध्दाच्या काळांत फॅसिस्ट जर्मनीच्या व जर्मन फौजेच्या परिस्थितींत आणि आपल्या देशाच्या व लाल फौजेच्या परिस्थितींत महत्वाचे फेरबदल घडून आले आहेत.

हे फेरबदल कोणते ?

## जर्मन फौजेची वाढती कमजोरी

पहिला मुद्दा म्हणजे, या काळांत फॅसिस्ट जर्मनीचें व जर्मन फौजेचें सामर्थ्य दहा महिन्यांपूर्वीपेक्षां निःसंशय कमी झालें आहे. युध्दामुळें जर्मन जनतेच्या अनेक भ्रमांचे भोपळे फुटले आहेत, लाखों माणसें प्राणास मुकलीं आहेत, उपासमार व दारिद्र्य यांचें थैमान सुरू झालें आहे; अजून युध्द समाप्त होण्याचीं कांहींच चिन्हें दिसत नाहींत, तरीसुध्दां मनुष्यबळाचा पुरवठा संपुष्टांत येत चालला आहे, तेल खलास होऊं लागलें आहे, कच्चा माल संपत आला आहे. जर्मनीच्या पराभवाची अपरिहार्यता जर्मन जनतेला अधिकाअधिक दिसूं लागली आहे. साहसबाज हिटलर—गोअरिंग कंपूच्या जोखडांतून जर्मनीची मुक्तता करणें हाच या परिस्थितींतून सुटण्याचा एकमेव मार्ग होय, ही गोष्ट जर्मन जनतेला अधिकाअधिक स्पष्ट होत आहे.

हिटलरी साम्राज्यवाद्यांनीं यूरपमधील विस्तीर्ण प्रदेश कबज्यांत घेतले आहेत, परंतु यूरपमधील निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेचा प्रतिकाराचा निर्धार ढांसळून पाडण्यांत त्यांना यश आलें नाहीं. गुलामगिरींत सांपडलेल्या या जनतेनें जर्मन फॅसिस्ट दरवडेखोरांच्या राजवटीविरुध्द जो लढा सुरू केला आहे त्याला सार्वत्रिक स्वरूप येऊं लागलें आहे. युध्दोपयोगी कारखान्यांत नासधूस, जर्मनीच्या दारूगोळ्याच्या कोठारांचा स्फोट, जर्मन सैन्यवाहक आगगाड्यांची मोडतोड, जर्मन सैनिकांचे व सेनाधिकाऱ्यांचे खून , हे प्रकार जर्मनव्याप्त प्रदेशांत दरदिवस चालू आहेत. सबंध यूगोस्लावियांत व जर्मनव्याप्त सोविएट मुलुखांत गनीमी योद्ध्यांनीं आग लावून दिली आहे.

या सर्व गोष्टींमुळें जर्मन पिछाडी कमजोर झाली आहे. याचा अर्थ हाच कीं फॅसिस्ट जर्मनी एकंदरीनेंच कमजोर झाला आहे.

जर्मन फौज जरी निकरानें स्वतःचा बचाव करीत आहे, तरी दहा महिन्यापूर्वीपेक्षां आज तिचें बळ फारच कमी झालें आहे. राय्शनौ, ब्राउशित्स, टोट, वगैरे जुन्या

व अनुभवी जर्मन सेनापतींना एकतर लाल फौजेनें यमसदनास पाठविलें आहे किंवा जर्मन फॅसिस्ट पुढाऱ्यांनींच वडतर्फ केलें आहे. जर्मन फौजेंतील अनुभवी सेनाधिकाऱ्यांपैकीं कांही लाल फौजेनें गारद केले आहेत, व कांहीं बिनलष्करी नागरीकांवरील अत्याचारांमुळें व लूटमारीमुळें नीतिभ्रष्ट होऊन बसले आहेत. जर्मन फौजेंतील सामान्य सैनिकांचें संख्यावळ प्रत्यक्ष लढायांतील संहारामुळें पुष्कळच कमी झालें आहे, व त्यांना मिळणाऱ्या कुमकेचें प्रमाण कमी कमी होत आहे.

## सोविएटचें वाढतें सामर्थ्य

दुसरा मुद्दा म्हणजे, युध्दाच्या सुरवातीपेक्षां युध्दकाळांत आपल्या देशाचें सामर्थ्य वाढलें आहे. ही गोष्ट आपले दोस्तच कबूल करतात असें नाहीं; आपल्या दुष्मनांनासुध्दां कबूल करावें लागत आहे कीं आज आपल्या देशांत जेवढी एकजूट आहे तेवढी पूर्वीं कधींच नव्हती, आज सोविएट सरकारला जनतेचा जेवढा पाठिंबा आहे तेवढा पूर्वीं कधींच नव्हता, आज आपलें रणांगणावरील सैन्य व पिछाडीवरील जनता मिळून संयुक्त युध्दतळ बनला असून त्यांच्यापुढें एकच ध्येय आहे, पिछाडीवरील सोविएट जनता रणांगणावरील फौजेला बंदुका, मशीनगन, ट्रेंचमॉर्टर, तोफा, टँक, विमानें, अन्नसामुग्री, दारूगोळा, वगैरेंचा पुरवठा सतत वाढत्या प्रमाणांत करीत आहे.

आपल्या देशाचे आंतरराष्ट्रीय स्नेहसंबंध अलीकडच्या काळांत जेवढे भक्कम व व्यापक झाले आहेत तेवढे पूर्वीं केव्हांहि नव्हते. जर्मन साम्राज्यशाहीला विरोध करण्यासाठीं सर्व स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांच्या जनतेनें एकजूट केली आहे. त्यांचे डोळे सोविएट यूनियनकडे लागून राहिले आहेत. आपल्या देशांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेनें स्वतःच्या इज्जतीचें व आजादीचें रक्षण करण्यासाठीं जो बहादुरीचा लढा चालविला आहे त्याबद्दल समग्र प्रगतिशील मानवजात प्रशंसा करीत आहे. हिटलरी महारोगापासून जगाला मुक्त करूं शकणारी शक्ति या नात्यानेंच सोविएट यूनियनकडे सर्व स्वातंत्र्य-प्रेमी राष्ट्रांची जनता पाहात आहे. या स्वातंत्र्यप्रेमी देशांत ब्रिटन व युनायटेड स्टेट्स यांना अग्रस्थान आहे. या दोन देशांशीं आपले स्नेहसंबंध जोडले गेले आहेत, त्यांची व आपली दोस्ती झाली आहे, व त्यामुळें जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांविरुध्द आपल्या देशाला वाढत्या प्रमाणांत लष्करी मदत मिळत आहे.

या सर्व गोष्टींवरून असा निष्कर्ष निघतो कीं आपल्या देशाचें सामर्थ्य पुष्कळच वाढलें आहे.

## लाल फौजेची चढाई

शेवटचा मुद्दा म्हणजे, युध्दाच्या सुरवातीपेक्षां या काळांत लाल फौज अधिक संघटित व समर्थ बनली आहे. जर्मन साम्राज्यवाद्यांनीं दगलबाजपणें हल्ला केल्यामुळें लाल फौजेला आरंभीं तात्पुरती माघार घ्यावी लागली, परंतु त्यानंतर लाल फौजेनें

युध्दाला नवें निर्णायक स्वरूपाचें वळण देण्यांत यश मिळविलें व सक्रिय बचावाचें धोरण सोडून देऊन शत्रूसैन्याविरुध्द यशस्वी चढाई करण्याचें धोरण अंमलांत आणलें, हें सर्वांना ठाऊकच आहे. हें परिवर्तन केवळ योगायोगानें घडून आलें असें आपण समजतां कामा नये. वस्तुस्थिति अशी आहे कीं लाल फौजेच्या विजयामुळें आपल्या देशभक्तिप्रेरित युध्दाचा नवा कालखंड सुरू झाला आहे. या नव्या कालखंडांत हिटलरी बदमाषांच्या हातून सोविएट भूमीची मुक्तता करण्यांत येणार ! लाल फौजेनें हें ऐतिहासिक महत्त्वाचें कार्य विकट परिस्थितींत हातीं घेतलें ही गोष्ट खरी आहे; त्या वेळीं भयंकर हिंवाळा चालू होता, बर्फाचा मुसळधार पाऊस पडत होता. तरीसुध्दां लाल फौजेला प्रचंड विजय मिळाला. युध्दांत प्रथमगामित्व (initiative) प्राप्त करून घेऊन लाल फौजेनें जर्मन फॅसिस्ट पलटणींना अनेकदां जोरानें मार दिला व त्यांना विस्तीर्ण सोविएट टापूंतून पिटाळून लावलें. हिंवाळ्यांत विश्रांति मिळेल, बचावाची रांग तयार करून तिच्यामागें स्वस्थ बसतां येईल, अशी स्वारीवाल्यांची अपेक्षा होती, पण ती फोल ठरली. लाल फौजेच्या चढाईंत शत्रूची प्रचंड संख्या गारद झाली आहे, त्याची प्रचंड शस्त्रसामुग्री नष्ट झाली आहे, त्याची बरीचशी शस्त्रसामुग्री लाल फौजेच्या हातीं सांपडली आहे, व वसंतऋतूंतील आणि उन्हाळ्यांतील लढाईसाठीं राखून ठेवलेल्या फौजा पिछाडीवरून आणणें व अवेळींच त्यांचा बळी देणें शत्रूला भाग पडलें आहे.

या सर्व गोष्टींवरून असा निष्कर्ष निघतो कीं लाल फौज अधिक संघटित व समर्थ झाली आहे, तिचे पुढारी प्रत्यक्ष रणांगणावरील अनुभवानें कणखर बनले आहेत, व तिचे सेनापति अधिक अनुभवी व चाणाक्ष बनले आहेत.

लाल फौजेच्या सामान्य सैनिकांतसुध्दां आमूलाग्र परिवर्तन घडून आलें आहे.

या देशभक्तिप्रेरित युध्दाच्या आरंभींच्या कांहीं महिन्यांत शत्रूच्या बाबतींत जी बेफिकिरी, जी उपेक्षावृत्ति, आपल्या सैनिकांत आढळून येत असे, ती आतां नष्ट झाली आहे. जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांनीं शांतताप्रिय नागरीकांवर व सोविएट युध्द-कैद्यांवर जे अनन्वित अत्याचार केले, जी लूटमार व छळणूक केली, तिच्यामुळें आपल्या सैनिकांतील हा दोष नाहींसा झाला आहे. आपले सैनिक आतां जास्तच चिडले आहेत, ते अधिक कठोर बनले आहेत. जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांविषयीं त्यांना खराखुरा द्वेष वाटूं लागला आहे. जर शत्रूविषयीं मनापासून द्वेष वाटत नसेल तर त्याचा पराभव करणें शक्य होणार नाहीं, हें त्यांना कळून चुकलें आहे.

युध्दाच्या आरंभीं जर्मन सैन्याच्या अजिंक्यपणाविषयीं बरीचशी वायफळ बडबड कानीं पडत असे. जर्मनांच्या मनांतील भीति लपवून ठेवण्याला ही बडबड उपयोगीं पडत असे. परंतु आतां ही बडबड बंद झाली आहे. रोस्तोव व कर्च, मॉस्को व कालिनिन, तिखविन व लेनिनग्राड, येथील सुप्रसिध्द लढायांत लाल फौजेनें जर्मन फॅसिस्ट

स्वारीवाल्यांना पिटाळून लावलें, व या लढायांमुळें आपल्या सैनिकांची खात्री झाली कीं जर्मन सैन्याच्या अजिंक्यपणाविषयींची ही वडवड म्हणजे फॅसिस्ट प्रचारकांनीं रचलेली दंतकथाच होय. युध्दाच्या अनुभवानें आपल्या सैनिकांना खात्रीपूर्वक कळून आलें आहे कीं जर्मन सेनाधिकाऱ्यांचें 'शौर्य' सापेक्षच असतें, निःशस्त्र युध्दकैद्यांच्या बाव-तींत व शांतताप्रिय बिनलष्करी नागरीकांच्या बाबतींत जर्मन सेनाधिकारी मोठें 'शौर्य' दाखवितात, परंतु लाल फौजेच्या संघटित शक्तीशीं गांठ पडतांच त्यांचें शौर्य कोठच्या कोठें पळून जातें ! जुन्या म्हणीची आठवण कराः—"शेळीसमोर शूर शिपाई, पण शिपायासमोर मात्र गरीव शेळी !"

जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांविरुध्द चालू असलेल्या युध्दाच्या अनुभवावरून हाच निष्कर्ष निघतो.

याचा अर्थ काय ?

## फॅसिस्टांचा संपूर्ण नायनाट

याचा अर्थ असा कीं जर्मन फॅसिस्ट स्वारीवाल्यांचा संपूर्ण नायनाट होईपर्यंत, समग्र सोविएट भूमींतून हिटलरी बदमाषांची संपूर्ण हकालपट्टी होईपर्यंत, आपण त्यांना चोप देत राहिलें पाहिजे, व तसें करणें आपणाला शक्य आहे.

कॉम्रेड्स ! आपण देशासाठीं व स्वातंत्र्यासाठीं लढत आहोंत. आपलें युध्द न्याय्य युध्द आहे. परकीयांचे मुलुख बळकावणें, इतर देशांतील जनतेला गुलाम बनविणें, अशा प्रकारचें आपलें ध्येय नाहीं. आपलें ध्येय स्पष्ट आहे. आपलें ध्येय उदात्त आहे. जर्मन फॅसिस्ट बदमाषांच्या हातून आपल्या सोविएट भूमीची सुटका करणें हें आपलें ध्येय आहे. यूक्रेन, मोल्डेविया, श्वेतरशिया, लिथुएनिया, लाटविया, एस्तोनिया, व कॅरेलिया, या प्रदेशांतील आपल्या बांधवांवर जर्मन फॅसिस्ट बदमाषांनीं जो लज्जास्पद व मानहानिकारक प्रसंग आणला आहे त्यांतून त्यांची सुटका करणें हें आपलें ध्येय आहे. हें ध्येय साध्य करण्यासाठीं आपण जर्मन फॅसिस्ट फौजेचा धुव्वा उडविला पाहिजे, आपल्या देशांत घुसलेल्या एकूण एक जर्मन सैनिकाला ठार केलें पाहिजे, फक्त शरण येणाऱ्या सैनिकांनाच जीवदान दिलें पाहिजे. याखेरीज अन्य मार्ग आपणां-पुढें नाहीं.

हें कार्य आपण पार पाडूं शकतों, व वाटेल ती किंमत देऊन तें पार पाडलेंच पाहिजे.

हें उच्च ध्येय साधण्यासाठीं आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी लाल फौजेपाशीं आहेत. फक्त एकाच गोष्टीची कमतरता आहेः—आपल्या देशांत तयार होणाऱ्या

उत्कृष्ट सामुग्रीचा शत्रूविरुध्द संपूर्ण उपयोग करणें आपणांला अद्यापि शक्य झालें नाहीं. म्हणून लाल फौजेंतील सैनिक, मशीनगनवाले, गोलंदाज, टँकयोध्दे, ट्रेंच-मॉर्टरवाले, वैमानिक, घोडेस्वार, या सर्वांनीं युध्दकलेंत पारंगत झालें पाहिजे, परिश्रमपूर्वक अभ्यास केला पाहिजे, आपापल्या कामांत तरबेज झालें पाहिजे, व अशा रीतीनें शत्रूचा निश्चितपणें पराभव केला पाहिजे. शत्रूचा पराभव करण्याची कला शिकण्याचा हाच मार्ग होय.

## सैनिकांना आज्ञा

कॉम्रेड्स ! लाल फौजेंतील व आरमारांतील सैनिकांनों, सेनाधिकाऱ्यांनों, राजकीय शिक्षकांनों, स्त्रीपुरुष गनीमी योध्यांनों !

आज मे-दिनानिमित्त तुम्हाला अभिवादन देतांना व तुमचें अभीष्टचिंतन करतांना मी पुढील आज्ञा करीत आहे:—

(१) सामान्य शिपायांनीं आपल्या बंदुकींचें संपूर्ण ज्ञान करून घेतलें पाहिजे, आपलीं शस्त्रें वापरण्यांत तरबेज झालें पाहिजे, आपल्या देशांत घुसलेल्या जर्मन फौजांचा नायनाट करणाऱ्या आपल्या बहादूर नेमबाजांप्रमाणें त्यांनींसुध्दां शत्रूला अचूक गोळी घालण्यास शिकलें पाहिजे !

(२) मशीनगनवाले, ट्रेंचमॉर्टरवाले, तोफखान्यांतील गोलंदाज, टँकयोध्दे, व वैमानिक, यांनीं आपल्या शस्त्रांचें संपूर्ण ज्ञान करून घेतलें पाहिजे, आपापल्या कामांत तरबेज झालें पाहिजे, फॅसिस्ट जर्मन स्वारीवाल्यांचा संपूर्ण उच्छाद होईपर्यंत त्यांना चोप देत राहिलें पाहिजे !

(३) निरनिराळ्या सेनांगांच्या संयुक्त तुकड्यांच्या अधिकाऱ्यांनीं या सेनांगांचे परस्परसंबंध पूर्णपणें समजून घेतले पाहिजेत, सैन्यनेतृत्वाच्या कलेंत तरबेज बनलें पाहिजे, लाल फौज आपलें दास्यविमोचनाचें महत्कार्य पार पाडण्यास समर्थ आहे हें सबंध जगाला दाखवून दिलें पाहिजे !

(४) समग्र लाल फौजेनें १९४२ सालींच जर्मन फॅसिस्ट सैन्याचा अंतिम पराभव घडवून आणला पाहिजे व हिटलरी बदमाषांच्या तावडींतून सोविएट भूमीची मुक्तता केली पाहिजे !

(५) स्त्रीपुरुष गनीमी सैनिकांनीं जर्मन पिछाडीला अधिक जोरानें गनीमी काव्याची झुंज चालविली पाहिजे, शत्रूचे वाहतूकमार्ग व संदेशमार्ग तोडून टाकले पाहिजेत, शत्रूच्या मुख्य कचेऱ्या व शस्त्रसामुग्रीचीं केन्द्रें जमीनदोस्त केलीं पाहिजेत,

अपल्या मातृभूमीला गांजणारांचा समाचार घेतांना बंदुकीच्या गोळ्यांची काटकसर करतां कामा नये !

महान् लेनिननच्या विजयी झेंड्याखालीं–पुढें चला, आणि विजय मिळवा !

जे. स्टालिन

सोविएट यूनियनचा संरक्षणखात्याचा जनता-कोमिसार

—०—

६२६९

REFBK-0006269

"आमचा महान् पुढारी कॉ. स्टालिन याच्या नेतृत्वाखालील आमचा सोविएट यूनियन देश व आमची सोविएट जनता केवळ यूरपमधील निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेलाच नव्हे, तर समग्र जगाला, दास्यमुक्त करील यांत शंका नाहीं."

कॉ. मोलोतोव

(मॉस्को येथें ता. २ ऑक्टोबर १९४१ रोजीं भरलेल्या त्रिराष्ट्र परिषदेंत कॉ. मोलोतोव यांनीं केलेल्या भाषणांतील उतारा.)